रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २६६
www.ramprahar.com
रविवार, १४ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२




## ‘दहशतवादी कारवायांमध्ये नियम पाळले जाणार नाही’

**नवी दिल्ली** : केंद्र सरकार दहशतवादाविरोधात सातत्याने कठोर भूमिका घेताना दिसत आहे.



२०१६मधील सर्जिकल स्ट्राईक आणि २०१९मधील बालाकोट एअरस्ट्राईक ही त्याचीच काही उदाहरणे आहेत. आता भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दहशतवादाविरोधात केल्या जाणाऱ्या कारवाईबाबत मोठे वक्तव्य केले आहे. दहशतवाद्यांना संपवताना कुठलेही नियम पाळले जाणार नाहीत, कारण दहशतवादी कुठल्याही प्रकारचे नियम मानत नाहीत. २०१४नंतर भारताचे परराष्ट्र धोरण बदलले आहे. आपले नवे परराष्ट्र धोरण दहशतवादाविरोधात लढण्यासाठी पुरेसे आणि योग्य आहे. दहशतवादी जर कुठल्याही प्रकारचे नियम पाळत नसतील, तर त्यांच्यावर पलटवार करताना आपण तरी नियम कशाला पाळायचे, असा सवाल करीत परराष्ट्रमंत्र्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

# मुख्यमंत्रिपदासाठी भूमिका बदलणारा मी नाही

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा उद्धव ठाकरेंना टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठिंबा देण्याबाबत गुढीपाडवा मेळाव्यात घोषणा केली होती तसेच त्या भूमिकेचे विश्लेषणही मी केले होते. २०१४च्या अगोदरची भूमिका निवडून आल्यानंतर पुन्हा सत्तेत येण्यासाठी बदलली जात असेल, तर मलाही भूमिका बदलणे आवश्यक होते, पण मी टीका करताना त्या मोबदल्यात काही मागितले नव्हते. मुख्यमंत्रीपद हवे, माझे ४० आमदार फोडले म्हणून मी टीका करीत नव्हतो. मी मुद्द्यांवर टीका केली होती. त्यानंतरच्या पाच वर्षांत ज्या चांगल्या गोष्टी झाल्या त्याचे स्वागत केले, असे म्हणत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना लगावला आहे.

मनसे नेते, पदाधिकाऱ्यांची बैठक शनिवारी (दि.१३) मुंबईत आयोजित करण्यात आली. या बैठकीनंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाचे विषय मार्गी लागले आहेत. त्यात राम मंदिराचा विषय आहे. १९९२पासून आतापर्यंत राम मंदिरासाठी अनेक कारसेवकांनी बलिदान दिले आहे. त्या वेळी कारसेवकांना गोळ्या घातल्या गेल्या होत्या. शरयू नदीत त्यांची प्रेते फेकण्यात आली. राम मंदिरासाठी चाललेले प्रदीर्घ आंदोलन विसरता येणार नाही. आता राम मंदिरासाठी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असला तरी नरेंद्र मोदी नसते, तर राम मंदिर पूर्ण झाले नसते.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांमुळे आणखी पाच वर्ष त्यांना संधी द्यावी, असे आपणास आणि पक्षाला वाटले. त्यामुळेच मनसेने महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शविला. पाठिंबा देताना महाराष्ट्रातील अनेक विषयांवर नेते, पदाधिकाऱ्यांची चर्चा केली, असे राज ठाकरे यांनी सांगितले.

कुठलाही घोळ नको म्हणून भाजप, शिवसेना, राष्ट्रवादीतील लोकांनी आमच्या कोणाशी संपर्क साधायचा याची यादी तयार होईल आणि त्यांच्यापर्यंत जाईल. आमच्याही पदाधिकारी, मनसैनिकांना योग्य मानाने वागवतील, अशी अपेक्षा आहे. पूर्णपणे सहकार्य करायचे आणि प्रचार करण्यासाठी सांगितले आहे, असे राज ठाकरे यांनी या वेळी स्पष्ट केले.

माझ्या सभांबाबत अजून काही निश्चित नाही. पुढे चर्चा झाल्यावर ठरवू. विधानसभा निवडणुकीची रंगीत तालीम म्हणून लोकसभेकडे पाहिले जात आहे. त्यादृष्टीने पदाधिकाऱ्यांना कामाला लागण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे राज ठाकरेंनी म्हटले.

### संजय राऊतांना प्रत्युत्तर

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुढीपाडवा मेळाव्यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्यानंतर महायुतीच्या नेत्यांनी राज ठाकरेंचे आभार मानले, तर महाविकास आघाडीने त्यांच्यावर टीका केली. या टीकेला राज ठाकरेंनी या वेळी उत्तर देत ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांना चिमटा काढला. ज्यांना कावीळ झालीय त्यांच्यासाठी जग पिवळे दिसू शकते. संजय राऊत आताच तुरूंगातून बाहेर आलेत. त्यामुळे कदाचित त्यांना तसे दिसू शकते, असे म्हणत राऊतांच्या नमोनिर्माण आणि फाईलच्या आरोपाला राज यांनी उत्तर दिले.

## भाजपचे ‘संकल्पपत्र’ आज होणार प्रसिद्ध

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




देशात लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून राजकीय पक्षांच्या प्रचार सभांना वेग आला आहे तसेच जाहीरनामे प्रसिद्ध करण्यात येत आहेत. दरम्यान, भाजपचा जाहीरनामा रविवारी (दि.१४) प्रसिद्ध होणार आहे. भाजपने आपल्या जाहीरनाम्याला ‘संकल्पपत्र’ असे नाव दिले आहे.

लोकसभा निवडणुकीसाठी भाजप आपल्या दिल्लीतील मुख्यालयात जाहीरनामा प्रसिद्ध करणार आहे. या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाध्यक्ष जेपी नड्डा, गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत.

भाजपने जाहीरनामा तयार करण्यासाठी २७ सदस्यीय समिती स्थापन केली होती. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली या समितीने काम पाहिले आहे. भाजपने संकल्पपत्राबाबत लोकांकडून सूचनाही मागविल्या होत्या तसेच बैठकांच्या अनेक फेऱ्या झाल्या असून त्यात आगामी निवडणुकीत जनतेला कोणत्या गोष्टींचे आश्वासन द्यायचे आहे हे ठरविण्यात आले. संकल्पपत्राची थीम ही मोदींची गॅरंटी : विकसित भारत २०४७ अशी असू शकते. याशिवाय यामध्ये देशाला विकसित बनवण्यासाठी अनेक घोषणा केल्या जातील. महिला आणि गरीबांवरही लक्ष केंद्रित केले जाऊ शकते, असे म्हटले जात आहे.

## मोदी है तो मुमकिन है!

### मुस्लिम बांधवांकडून मशिदीत अबकी बार चारसो पारच्या घोषणा

**अलीगंज : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीसाठी भाजपसह एनडीएने ४०० पारचा नारा दिला आहे. त्यानुसार प्रचार सुरू आहे. या सगळ्या वातावरणात एका मशिदीत अब की बार ४०० पार, हर हर मोदी घर घर मोदी, मोदी है तो मुमकिन है या घोषणा देण्यात आल्या.

मध्य प्रदेशातील भोपाळमधील अलीगंज हैदरी मशिदीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थनार्थ मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली. त्याचप्रमाणे बोहरा समाजाने मशिदीच्या आत पीएम मोदींचे पोस्टर दाखवले.

भोपाळमधील भाजप उमेदवार आलोक शर्मा यांच्या समर्थनार्थ बोहरा समाजाच्या लोकांनी एकत्र येऊन पंतप्रधान मोदी आणि भाजपला यश मिळावे म्हणून प्रार्थना केली. या वेळी आमिल जौहर अली यांनी पंतप्रधान मोदींचे भरभरून कौतुकही केले.

## ‘आदिवासींना मोठे होताना काँग्रेसला बघवत नाही’

**गडचिरोली** : काँग्रेसच्या नेत्यांना सर्वसामान्य आदिवासीचा मुलगा मोठा होतानाचे बघवत नाहीय, कारण आदिवासींना आपल्या हाताखालचे चपराशी करण्याची मानसिकता त्यांची असल्याची टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. महायुतीचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनीही काँग्रेस नेते विजय वडेट्टीवारांच्या विधानाचा समाचार घेतला.

## मी नाराज नाही; महायुतीचा प्रचार करणार!

**यवतमाळ : प्रतिनिधी**

मी प्रचारात उतरले नाही म्हणून मी नाराज असल्याच्या चर्चा उद्भवल्या, पण मी नाराज बिलकूल नाही. तिकीट न दिल्याने खंत वाटली, पण मी पक्षाविरोधात जाणार नाही. माझ्या वडिलांनी १९८५पासून जिल्ह्यात शिवसेनेचे काम सुरू केले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही शिवसेनेसाठी अहोरात्र काम केलेले आहे. त्यामुळे त्यांचे हात बळकट करण्यासाठी मी राजश्री पाटील यांच्या प्रचारात उतरणार आहे. महायुतीच्या उमेदवाराच्या पारड्यात यश पडावे आणि नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान व्हावेत यासाठी मी हातभार लावणार आहे, अशी भूमिका भावना गवळी यांनी शनिवारी (दि.१३) पत्रकार परिषदेद्वारे जाहीर केली.



यवतमाळ-वाशीम लोकसभा मतदारसंघाचे पाचवेळा नेतृत्व केलेल्या शिवसेनेच्या विद्यमान खासदार भावना गवळी यांना या वेळी तिकीट न दिल्याने त्या नाराज असल्याची चर्चा होती. उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन दिवसांपूर्वी जाहीर सभा घेतली, पण या सभेला भावना गवळी अनुपस्थित राहिल्या. त्यामुळे तर्क-वितर्क लढविले जात होते, परंतु आता स्वतः खासदार गवळी यांनीच त्यावर पडदा टाकला आहे.

### खासदार भावना गवळी यांनी जाहीर केली भूमिका

पत्रकार परिषदेत खासदार गवळी म्हणाल्या, मी २५ वर्षांपासून काम करतेय. शिवसेना जिल्हाप्रमुख, खासदार म्हणून काम केलेय. माझे वडील शिवसेनेत होते. लहानपणापासून बाळकडू मिळाले आहे. १९९९पासून यवतमाळ-वाशिमचे प्रतिनिधित्व करीत आहे. वाशिमची निर्मिती झाल्यापासून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करीत आले आहे. आयुष्यात नेहमी चढउतार पाहिले आहेत. संघर्षातून पुढे आलीय. त्यामुळे नाराज होत नाही. आपण कुठे कमी पडलो याचे आत्मचिंतन करणारी मी आहे. जनतेने माझ्यावर विश्वास टाकला आहे. त्याला तडा जाणार नाही यासाठी मी काम करीत असून महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यायासाठी आम्ही कामाला लागलो आहोत.

## एकवीरा देवीच्या यात्रेसाठी भाविक कार्ल्याला रवाना

### उद्या पालखी सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान आणि आगरी, कोळी, कोकणी बांधवांचे कुलदैवत असलेल्या वेहेरगाव, कार्ला येथील एकवीरा गडावर सोमवारी (दि. १५) देवीचा पालखी सोहळा रंगणार आहे. यासाठी रायगडसह ठिकठिकाणाहून भाविक रवाना झाले आहेत.

कार्ला येथील डोंगरावर वसलेली एकवीरा माता ही अत्यंत जागृत असून या देवीची यात्रा अवघ्या महाराष्ट्रासाठी पर्वणी असते. विशेषतः कोकणातील असंख्य कोळी व आगरी बांधवांची एकवीरा आईवर मोठी श्रद्धा आहे. चैत्र शुद्ध सप्तमीला देवीचा पालखी सोहळा पार पाडतो. एकवीरा गडावरील पालखी सोहळा अनुभवण्यासाठी लाखोंच्या




संख्येने भाविकांची गर्दी होते. देवीच्या दर्शनासाठी मुंबई, ठाणे, कोकणातून मोठ्या संख्येने पालख्या घाटावर दाखल होत आहेत. वेहेरगाव येथे यात्रेनिमित्त दुकानेही सजली आहेत.

चैत्र शुद्ध षष्ठी (रविवार) ते चैत्र शुद्ध अष्टमी (मंगळवार) अशी तीन दिवस एकवीरा देवीची यात्रा आहे. षष्ठीस आई एकवीरा देवीचा भाऊ मानलेल्या देवघर येथील काळभैरव देवाची यात्रा होते आणि येथूनच एकवीरा देवी यात्रेस सुरुवात होते. रविवारी देवघर येथून काळभैरव देवाची पालखी निघणार आहे. सोमवारी देवीचा पालखी सोहळा होणार असून मंगळवारी देवीस तेलवण व मानाचा कार्यक्रम होणार आहे.

यात्रा काळात एकवीरा गडावर भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेऊन सुरक्षेसाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, तर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी १४ ठिकाणी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. अनुचित प्रकार टाळण्यासाठी ग्रामस्थांच्या सहकार्याने स्वयंसेवी संस्थांचीही मदत घेतली असून मोठ्या संख्येने स्वयंसेवक नेमणूक केली आहे.



# दहशतवादाविरोधात कठोर कारवाई सुरूच ठेवणार

## परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी मांडली ठाम भूमिका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकार दहशतवादाविरोधात सातत्याने कठोर भूमिका घेताना दिसतेय. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दहशतवादाविरोधात केल्या जाणाऱ्या कारवाईबाबत भारताची ठोस भूमिका स्पष्ट केली आहे.



एस. जयशंकर म्हणाले, दहशतवाद्यांचा संपवताना कुठलेही नियम पाळले जाणार नाहीत कारण दहशतवादी कुठल्याही प्रकारचे नियम मानत नाहीत. २०१४नंतर भारताचे परराष्ट्र धोरण बदलले आहे. आपले नवे परराष्ट्र धोरण दहशतवादाविरोधात लढण्यासाठी योग्य आहे. दहशतवादी जर नियम पाळत नसतील तर त्यांच्यावर पलटवार करताना आपण तरी नियम कशाला पाळायचे? असा सवाल त्यांनी केला.

एस. जयशंकर म्हणाले, दहशतवादाविरोधातील कारवाईदरम्यान कुठल्याही प्रकारच्या नियमांचे पालन केले जाणार नाही. भारताला कोणत्या देशांबरोबर राजकीय संबंध निर्माण करताना जास्त समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे विचारल्यानंतर यावर पाकिस्तानचे नाव न घेता जयशंकर म्हणाले तो देश आपल्या शेजारी असून त्याला आपणच जबाबदार आहोत.

१९४७मध्ये पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला केला होता. भारतीय सैन्याने त्यांना जशास तसे उत्तर दिले. त्यानंतर त्या राज्याचे भारतात विलिनीकरण करण्यात आले. भारतीय सैन्य त्यांच्या पद्धतीने कारवाई करत होते. ही कारवाई चालू असतानाच आपण थांबलो आणि संयुक्त राष्ट्रांत धाव घेतली. त्या वेळी संयुक्त राष्ट्रांत केलेल्या तक्रारीत आपण त्या हल्लेखोरांचा उल्लेख दहशतवादी करण्याऐवजी घुसखोर असा केला. आपल्या या सगळ्या भूमिकांमुळे आपलेच नुकसान झाले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर म्हणाले, आपण आधीच स्पष्ट करायला हवे होते की, पाकिस्तान दहशतवादाचा वापर करतोय. तसे केले असते तर आपली धोरणे बदलली असती. संयुक्त राष्ट्रांनीही ती समस्या वेगळ्या दृष्टीकोनातून पाहिली असती. जयशंकर यांनी या वेळी स्पष्ट केले की, आपला देश दहशतवादाच्या विरोधात कारवाया करीत राहिल, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

## पोलादपूरमध्ये दोन दुचाकींची धडक

### अपघातात एकाचा मृत्यू, तीन जण जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर तालुक्यातील लोहारे येथे शनिवारी (दि.१३) दुपारी १२.१५ वा.च्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. या अपघातात चारजण जखमी झाल्याची माहिती पोलादपूर पोलीस सुत्रांनी दिली आहे. चारपैकी अनिल नाना पालांडे हा उपचारादरम्यान मृत पावल्याची माहिती पोलीस सुत्रांनी उशिरा दिली.

पार्टेकोंड येथील आशिष अशोक पार्टे (वय २७) हा त्याच्या दुचाकी (एमएच ०२ बीए ३२८) भरधाव वेगाने चुकीच्या दिशेने महामार्गावरून लोहारे गावाच्या हद्दीत आला असता पोलादपूरकडून महाडच्या दिशेने जाणाऱ्या ॲक्टीव्हा (एमएच ०१ डीएम ५५४७)वरील अनिल नाना पालांडे (वय ५२, पार्ले बौद्धवाडी) यांना जोरदार धडक दिली. या अपघातात आशिष अशोक पार्टे, फिर्यादी अंकुश राजाराम सकपाळ (३५, पार्टे कोंड), अनुग्रह अंकुश सकपाळ (९, पार्टेकोंड) आणि ॲक्टीव्हा स्कूटरचालक अनिल नाना पालांडे हे जखमी झाले. आशिष अशोक पार्टे (वय २७) याच्याविरोधात पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. उपचारादरम्यान ॲक्टीव्हा स्कूटरचालक अनिल नाना पालांडे यांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी उशिरा दिली. पोलीस निरीक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अंमलदार व्हि. व्हि. महाडीक यांनी गुन्हा दाखल केला असून तपासिक अंमलदार पोलीस हवालदार जागडे अधिक तपास करीत आहेत.



## ‘रोह्यात सुसज्ज हॉस्पिटलसाठी महायुतीच्या माध्यमातून पाठपुरावा करणार’

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत भाजपची बुथ कार्यकर्ता व सुपर वॉरियर्स आणि निवडणूक नियोजन बैठक शुक्रवारी (दि. ५) शहरातील टाऊन हॉलच्या समोर पार पडली.



महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी, या प्रश्नांबाबत सकारात्मक भावना मांडली व आगामी काळात महायुतीचे कार्यतत्पर खासदार निश्चितच सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न करतील, असे आश्वस्त केले.

या वेळी रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी, रोहातील प्रदूषित कुंडलिका नदी, एमआयडीसीमधील बंद असलेल्या कंपन्या पुन्हा सुरू करणे यांसारयख्या प्रश्नांवर काम झाले पाहिजे, असे मत मांडले. रोह्यात सुसज्ज हॉस्पिटल उभे रहावे अशी सर्व रोहेकरांची मागणी आहे. भाजप या प्रश्नाबाबत जबाबदारीने पाठपुरावा करणार असल्याचे रोशन चाफेकर यांनी सांगितले.

रोहातील सभेला मंत्री आदिती तटकरे, आमदार रविशेठ पाटील, सहकारी क्षेत्र प्रदेश उपाध्यक्ष गिरीश तुळपुळे, विधानसभा प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस प्रशांत शिंदे, जिल्हा सरचिटणीस महेश मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मापारा, वैकुंठ पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, गीता पालरेच्या, सोपान जांभेकर, निमिश वाघमारे, राजन डुंबे, पि. व्हि. सनल कुमार, मंजु कुंद्रीमोदी, जयश्री भांड, श्रेया कुंटे, वैशाली मापार, छाया तारु, श्रद्धा घाग, अपर्णा सुटे, यांसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्रातील प्रमुख धरणांमध्ये ३४.१० टक्के पाणीसाठा; २०९३ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होऊ लागला आहे. जलसंपदा विभागाने शुक्रवारी (दि. १२) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठा अवघ्या ३४.१० टक्क्यांवर आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील धरणांमध्ये केवळ १८.३१ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने परिस्थिती खूपच बिकट बनली आहे. या स्थितीमुळे टँकरने पाणीपुरवठा करणारी गावे आणि वाड्यांची संख्या वाढली असून, राज्यभरात सध्या दोन हजार ९३ टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.



टँकरने राज्यातील विविध गावे आणि वाड्यांमध्ये सुरू असलेल्या पाणीपुरवठाबाबतचा अहवालही राज्य सरकारने जाहीर केला. त्यानुसार शुक्रवारपर्यंत एकूण एक हजार ६६५ गावे आणि तीन हजार ९९९ वाडे आता पाण्यासाठी टँकरवर विसंबून आहेत.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा टँकरची गरज तब्बल २८ पटीने वाढल्याचे आकडेवारीवरून दिसत आहे. राज्यात २२ जिल्ह्यातील एक हजार ६६५ गावे आणि तब्बल तीन हजार ९९९ वाड्यांची तहान भागविण्यासाठी दोन हजार ९३ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यात खासगी टँकरची संख्या दोन हजार चार, तर शासकीय टँकरची संख्या ८९ इतकी नोंदविण्यात आली आहे.

धरणांमधील पाणीसाठा लक्षात घेता राज्यातील सर्व मोठे प्रकल्प, मध्यम, प्रकल्प आणि महाराष्ट्र राज्य प्रकल्प अशा सर्व प्रमुख धरणांमध्ये शुक्रवारपर्यंत ३४.१० टक्के पाणीसाठा शिल्लक होता. त्यातील एकूण १३८०६.२४ दक्षलक्ष घनमीटर इतकाच पाणीसाठा उपयुक्त असल्याचे कळते.

यात नागपूर येथे ४५.१६ टक्के , अमरावती ४२.४८ टक्के, छत्रपती संभाजीनगर येथे १८.३१ टक्के, नाशिक येथे ३५.२५ टक्के, पुणे येथे ३१.६७ टक्के आणि कोकणात ४१.०७ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## दागिने लंपास करणाऱ्या दोन भामट्यांना अटक

### ठाणे आणि मुंबईतील १६ गुन्हे उघडकीस

**ठाणे : प्रतिनिधी**

बोलण्यात गुंतवून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या दोन भामट्यांना ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या उल्हासनगर युनिटने अटक केली असून त्यांच्याकडून ठाणे आणि मुंबई परिसरातील १६ गुन्हे उघडकीस आले आहेत. अशा स्वरुपाच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात दोघांना यापूर्वीसुद्धा अटक झाली होती आणि तीन महिन्यांपूर्वी कारागृहातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी पुन्हा असे गुन्हे करण्यास सुरुवात केली होती, अशी माहिती तपासात पुढे आली आहे.

अनिल कृष्णा शेट्टी (४३) आणि रमेश विजयकुमार जैस्वाल (४७) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. हे दोघे अंबरनाथ तालुक्यातील भालगाव परिसरात राहतात. ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या शहरातील बाजारपेठ, सार्वजनिक रस्ता अशा ठिकाणी नागरिकांना बोलण्यात गुंतवून भामटे त्यांच्याकडील दागिने लंपास करीत असल्याच्या घटना वाढू लागल्या होत्या. याप्रकरणी नौपाडा, उल्हासनगर, बदलापूर पुर्व, शिवाजीनगर, अंबरनाथ, विठ्ठलवाडी, महात्मा फुले चौक, डोंबिवली तसेच जिल्ह्यातील इतर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

आरोपी गुन्ह्याची आणि राहण्याची जागा सातत्याने बदलत असल्यामुळे त्यांना पकडणे शक्य होत नव्हते. या प्रकरणाचा संमातर तपास ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या उल्हासनगर युनीटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांच्या पथकाने सुरू केला होता. या पथकाने तपास करून अनिल आणि रमेश या दोघांना अटक केली.

या दोघांनी ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ११ तर, मुंबई शहरात सहा असे एकूण १६ गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले आहे, अशी माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली. ठाणे पोलीस आयुक्तालयात केलेल्या ११ गुन्ह्यातील १७ लाख २८ हजारांचा ऐवज दोघांकडून जप्त करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

## कर्जतमधील तरुण सहा महिन्यांपासून बेपत्ता

**कर्जत : प्रतिनिधी**

ऑक्टोबर २०२३मध्ये हरवलेल्या मुलाबाबत सहा महिन्यानंतरदेखील कर्जत पोलिसांकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे मुलाच्या आईने खंत व्यक्त केली आहे.

२४ ऑक्टोबर २०२३ रोजी शहरातील ओम धर्मोदय अपार्टमेंटमध्ये राहणारा श्रेयस यशवंत देशमुख (वय २२) हा मुलगा मानसिक तणावामुळे घरातून जात असल्याची चिठ्ठी टेबलावर ठेवून निघून गेला तो आजपर्यंत घरी परतलेलाच नाही. त्याची आई सुजाता देशमुख यांनी कर्जत पोलीस ठाण्यात मुलगा हरवल्याची तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीचा तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीकहक संजय जगताप करीत होते, परंतु मुलाचा शोध लागनाही. मुलाकडे असलेल्या मोबाईलचे सिडीआर लोकेशन बंद आल्यामुळे शोधण्यास अपयश येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

मुलाच्या आईने दिलेल्या माहितीनुसार, ज्या ज्या ठिकाणी मुलाला पाहिले गेले त्या त्या ठिकाणी आम्ही शोध घेतला, त्याचे स्केच व माहिती ठिकठिकाणी दिलेली आहे, मात्र अद्याप मुलाचा तपास लागला नाही. कर्जत पोलीस माझ्या मुलाला नक्कीच शोधून काढतील, असा विश्वास सुजाता देशमुख यांनी व्यक्त केला.

## शेफ विष्णू मनोहर यांनी बनवली तब्बल १० हजार किलोंची मिसळ

### उपमुख्यमंत्री पवार, मंत्री पाटीलांनीही घेतला आस्वाद

**पुणे : प्रतिनिधी**

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपचे नेते, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुण्यातील गंज पेठेतील महात्मा फुले वाड्याला भेट दिली. या वेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शेफ विष्णू मनोहर यांनी फुले वाड्यात १० हजार किलोची मिसळ तयार केली. अजित पवार आणि चंद्रकांत पाटील यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून मेजवानीचा आनंद लुटला.



महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्यावतीने फुले वाड्यात आयोजित कार्यक्रमादरम्यान येणाऱ्या नागरिकांना ही मिसळ वाटण्यात येणार आहे. भव्य एकता मिसळ कार्यक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. शेफ विष्णू मनोहर यांनी मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थ बनवण्याची ही पहिलीच वेळ नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेफ विष्णू मनोहर यांच्याकडून मिसळ कशी बनवली याची माहिती घेतली.

## अलिबाग भाकरवड येथे रंगली भजन स्पर्धा

### श्री बाप्पादेव प्रासादिक मंडळ प्रथम

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील भाकरवड येथे आयोजित भजन स्पर्धेत श्री बाप्पादेव प्रासादिक भजन मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला. श्रीकृष्ण भजन मंडळ कोंझर आवेटी द्वितीय, धाकटे शहापूर येथील नवनाथ भजन मंडळाने तिसरा क्रमांक पटकावला. भाकरवड येथील मरीआई प्रासादिक सेवा भजन मंडळाने या स्पर्धेचे आयोजन केले होते.

सचिन साळुंखे यांच्या सहकार्याने मंडळाने हा उपक्रम राबवला. या स्पर्धेत सागरगड पंचक्रोशीतील १५ भजन मंडळांनी सहभाग घेतला यात महिला आणि लहान मुलींच्या भजन मंडळांचाही समावेश होता. बासरी वादक सचिन धुमाळ यांचया जुगलबंदीने कार्यक्रमात रंगत आणली. त्यांना पखवाजवर प्रतीक नाईक आणि मृदुंगावर निमिष जुईकर यांनी उत्तम साथ दिली. श्री विठ्ठल प्रासादिक भजन मंडळ लेभी आणि श्री हनुमान संगीत भजन मंडळ देहेन यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. उत्कृष्ट पखवाज, गायक आणि चकवा अशी पारितोषिकेही देण्यात आली.



स्पर्धेचे उद्घाटन सचिनभा साळुंखे, ओंकार साळुंखे, भाकरवडचे अध्यक्ष शंकर पाटील, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, उद्योजक महेंद्र पाटील, हभप जगन्नाथ राऊत, हभप विद्याधर महाराज नीलकर, हभप शशिकांत पाटील, कृषी अधिकारी अरुण राऊत आदींच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेच्या निमित्ताने डॉ. अभय राऊत यांना वैद्यकीय, जीवन पाटील यांना सामाजिक, हभप विद्याधर महाराज निलकर यांना आध्यात्मिक, हभप शशिकांत पाटील आध्यात्मिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल सचिनभाऊ साळुंखे प्रतिष्ठानचे संस्थापक ओमकार साळुंखे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. गावातील आठ महिला बचत गटांना सन्मान करण्यात आला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून हभप दत्तात्रेय बुवा ओढांगीकर, हभप विजयबुवा शहापूरकर, हभप विनोद भाऊ घरत पनवेलवर व जे. ए. पाटील यांनी काम पाहिले.

## रोह्यातून एकवीरा देवीच्या दरबारी चार पदयात्रा

**धाटाव : प्रतिनिधी**

लोणावळानजिक कार्ला येथे चैत्र महिन्यात साजरा होणाऱ्या आई एकवीरा देवीच्या पालखी सोहळयासाठी रोहा येथून सालाबादप्रमाणे शेकडो भक्तगण पायी चालत शनिवारी (दि.१३) कार्ला डोंगराकडे निघाले. यंदा रोहा तालुक्यातून ४००हून अधिक भक्तगणांनी कार्ला डोंगराकडे कूच केली आहे. सोमवारी एकवीरा देवीचा पालखी उत्सव साजरा होणारा आहे.

रोहा शहरातील धनगर आळी मंडळ, रोठखुर्द गावातील जय भवानी मंडळ, झोलांबे येथील हनुमान सेवा मंडळ व खारापटी येथिल पदयात्रा मंडळाच्या माध्यमातून चैत्र महिन्यातील कार्ला येथिल आई एकवीरा देवीच्या पालखी सोहळ्यासाठी दरवर्षी शेकडो भक्तगण पायी चालत जातात. शुक्रवारपासूनच पदयात्री भक्तांची लगबग सुरू झालेली, खारापटी येथील पदयात्रेचे शुक्रवारी प्रस्थान झाले, तर रोठ खुर्द, झोळांबे व धनगर आळी येथील पदयात्रा शनिवारी पहाटे येथून मार्गस्थ झाल्या. पदयात्रेत भक्ती, भजन, नामस्मरण आदी कार्यक्रम होतात.



या पदयात्रा आपापल्या पालखीसोबत वाकण, पाली, जांभूळपाडा खोपोली, खंडाळा, लोणावळा आदी ठिकाणी थांबा घेत एकविरा गडावर पोहचतात. परतीच्या प्रवासात रोहा येथे आल्यानंतर काहींची धावीर महाराजांचे दर्शन घेत पालखीची शहरातून भव्य मिरवणूक काढतात.

# उरण फुंडे येथे रानसई धरणाची जलवाहिनी फुटली

## हजारो लिटर पाणी वाया

**उरण : प्रतिनिधी**

रानसई धरणाची जलवहिनी उरण-पनवेल मार्गालगत फुंडे बसथांबा येथे शनिवारी (दि.१३) सायंकाळी फुटली. यामुळे रस्त्याच्या बाजूला हजारो लिटर पाणी वाया गेले, मात्र काही वेळात याची माहिती एमआयडीसीला मिळताच जलवाहिनीचा प्रवाह बंद करण्यात आला. त्यामुळे काही प्रमाणात पाणी वाचले. ही गळती म्हणजे दुष्काळात तेरावा महिना अशी स्थिती निर्माण झाली.



उरणमधील २५ ग्रामपंचायती आणि येथील औद्योगिक विभागाला पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई धरणाने तळ गाठला आहे. त्यामुळे नोव्हेंबरपासूनच आठवड्यातील मंगळवार आणि शुक्रवार या दोन दिवसांची पाणीकपात सुरू आहे. त्यात आता उन्हाळ्यात पाण्याची बचत करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

असे असताना एमआयडीसीच्या निष्काळजीपणामुळे उरण-पनवेल रस्त्यावरील जलवाहिनी फुटल्याने पाण्याची गळती लागून असलेल्या पाण्याचा अपव्यय होत आहे.

या घटनेनंतर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे, मात्र तत्परतेने एमआयडीसीने ही जलवाहिनीचा प्रवाह बंद करण्यात आला. त्यामुळे पाणी वाचले.

# पनवेल कोर्टाजवळ झाड कोसळले

## चार रिक्षा आणि एका कारचे मोठे नुकसान

**पनवेल, खारघर : वार्ताहर, प्रतिनिधी**

पनवेल न्यायालयाच्या परिसरात शुक्रवारी (दि.१२) मोठे चिंचेचे झाड उन्मळून कोसळल्याने चार रिक्षा आणि एका कारचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला या घटनेबाबत कळविल्यानंतर तत्काळ अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. यामध्ये अग्निशमन दलाचे सहा जवान आणि वृक्ष प्राधिकरणाचे १० कर्मचाऱ्यांनी त्वरित बचावकार्य सुरू केले. साधारणतः ४.३०वा.च्या सुमारास याठिकाणची परिस्थिती पूर्वपदावर आली. जेसीबी आणि कटरच्या सहाय्याने झाडाच्या तुटलेल्या फांद्या बाजूला करण्यात आल्या. या घटनेत रिक्षांचे आणि कारचे मोठे नुकसान झाले.

पनवेल कोर्ट परिसरात नागरिकांची मोठी गर्दी असते. न्यायालयात येणारे आपल्या गाड्या या कोर्ट परिसरात झाडांच्या आडोशाला लावत असतात. प्रचंड उन्हात झाडाखाली सावलीत या गाड्या पार्क केल्या होत्या, मात्र अतिशय जुनाट असे हे झाड उन्मळून या गाड्यावर पडले. या घटनेमुळे मान्सूनपूर्व अशा धोकादायक झाडांची छाटणी करण्याची मागणी केली जात आहे.

**या घटनेची माहिती मिळताच आम्ही घटनास्थळी धाव घेतली. रस्त्यावरील झाड बाजूला करण्यासाठी काही काळ लोखंडी पाडा येथील रस्ता बंद करण्यात आला होता. या घटनेत गाड्यांचे नुकसान झाले आहे. सुदैवाने जीवितहानी झाली नाही.**

**-संदीप पाटील,**
**अग्निशमन केंद्र उपअधिकारी, पमपा**



# तोतया पोलिसांनी वृद्धाची सोनसाखळी, अंगठी केली लंपास

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करून ६४ वर्षीय वृद्धाकडील सोन्याची चेन आणि सोन्याची अंगठी घेऊन दोन चोरट्यांनी फसवणूक करून निघून गेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दिनेश शंकर कांबळे हे सेवानिवृत्त आहेत. ते आदई सर्कल येथील मार्केटमध्ये गेले होते. त्यानंतर ते पायी चालत घरी जात असताना रस्ता क्रॉस करून सुखकर्ता बंगल्याजवळ, सेक्टर १० नवीन पनवेल येथे पोहचले. या वेळी एका व्यक्तीने त्यांना अडवले व 'सोने घालून फिरू नका आम्ही पोलीस आहोत, आमचे मोठे साहेब येत असून तुम्ही सोने काढून ठेवा', असे सांगितले. तुम्हाला दंड भरावा लागेल, असे सांगून दुसरा व्यक्ती त्या ठिकाणी आला. पहिल्या व्यक्तीने रस्त्याच्या पलिकडे उभ्या असलेल्या व्यक्तीकडे जाण्यास सांगितले. ते रस्ता ओलांडून त्या ठिकाणी गेले. त्या दोघांनी तुम्ही दंड भरा, नाहीतर गळ्यातली चेन काढून खिशात ठेवा, असे सांगितले. त्यामुळे त्यांनी सोन्याची चेन काढली. त्यानंतर त्या व्यक्तीने कागद काढला व त्यात सोन्याची चेन ठेवण्यास सांगितले व हातातील अंगठी काढून त्या कागदात ठेवण्यास सांगितली. त्यांनी तो कागद त्यांच्या हातात दिला व घरी जाण्यास सांगितले.

काही अंतर पुढे गेल्यानंतर दिनेश कांबळे यांनी कागद उघडून पाहिला असता त्यात लहान दगड गुंडाळल्याचे दिसले. फसवणूक झाल्याचे लक्षात येतात त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल केला.

# खारघरमध्ये पर्यावरणप्रेमींकडून वृक्षसंवर्धनाचा संदेश

**खारघर : रामप्रहर वत्त**

वाढत्या उष्णतेच्या झळांचा मानवासह पशू-पक्ष्यांना फटका बसत आहेत. सर्वांच्याच अंगाची लाहीलाही होत आहे. झाडांनाही उन्हाळ्यात जगवण्यासाठी खारघरमधील काही पर्यावरणप्रेमींनी पेड है तो पहाड हैं असा संदेश देत झाडांना पाणी देऊन झाडे जगविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

खारघर परिसरात वास्तव्य करणाऱ्या काही पर्यावरणप्रेमींनी तळोजा मध्यवर्ती कारागृहासमोरील डोंगराच्या पायथ्याशी पाच हजारांहून अधिक रोपांची लागवड केली आहे. त्यातील बहुतांश रोपट्यांची वाढ दहा ते पंधरा फुटांपर्यंत झाली आहे.

झाडे कार्बनडाय ऑक्साईड वायू स्वच्छ करण्यात मदत करतात. वाढत्या उन्हामुळे लावलेली झाडे उन्हात सुकू नये, त्यांची वाढ व्हावी यासाठी काही पर्यावरणप्रेमींकडून तळोजा कारागृहासमोरील तलाव आणि परिसरात स्वच्छता मोहीम राबविली जाते, तसेच दररोज पहाटे झाडांना पाणी देऊन पोटच्या मुलाप्रमाणे जपणूक करून झाडे जगवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

# वाहतूक शाखेचा रिक्षाचालकांवर कारवाईचा बडगा

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील बेशिस्त रिक्षांबाबत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त होत होत्या. त्या अनुषंगाने डीसीपी ट्रॅफिक तिरुपती काकडे, एसीपी ट्रॅफिक बोंडे यांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एस. एस. काणे, महिला पोलीस उपनिरीक्षक एस. एस. पाटील, पोलीस उपनिरीक्षक एस. बी. शिंदे व स्टाफ यांनी खारघर वाहतूक शाखा हद्दीत बुधवारी १४ बेशिस्त रिक्षांवर व भाडे नाकारणाऱ्या तीन अशा एकूण १७ रिक्षांवर कारवाई केली आहे.



यापैकी भाडे नाकारणाऱ्या तीन रिक्षा चालकांकडे डमी पॅसेंजर पाठवून भाडे नाकारले म्हणून तीन रिक्षांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच वाहतुकीस अडथळा होईल अशा लावलेल्या रिक्षा, तीनपेक्षा जास्त प्रवासी घेऊन जाणे, विनायुनिफॉर्म रिक्षाचालक, भाडे नाकारणाऱ्या रिक्षा या व इतर हेडखाली सन २०२३मध्ये ८४२ रिक्षांवर व सन २०२४मध्ये आजपर्यंत ४०४ रिक्षांवर कारवाई केल्या व यापुढेही अशा बेशिस्त रिक्षा चालकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे वपोनि. संतोष काने यांनी या वेळी सांगितले.

# नवघर आरोग्य उपकेंद्राला डॉक्टर, परिचारिकांची प्रतीक्षा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या उदासीन धोरणामुळे मागील वर्षापासून नवघर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र हे डॉक्टर, परिचारिकांच्या प्रतिक्षेत आहे. त्यामुळे खेडेगावातील रुग्णांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात जावे लागत आहे.

राजिप माजी सदस्य विजय भोईर यांनी आपल्या नवघर या जिल्हा परिषदेच्या मतदार संघातील लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या फंडातून सुमारे ४८ लाख रुपये खर्च करून नवघर ग्रामपंचायत हद्दीत २०२२-२३ या वर्षात प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची उभारणी केली, मात्र या उपकेंद्रात रिक्त असलेली समुपदेशन अधिकारी (सीएचओ), एएनएम (परिचारिका) पदे मागील वर्षापासून भरली गेली नाहीत. त्यामुळे एक आरोग्यसेवक नवघर, पागोटे, भेंडखळ, बोकडविरा, फुंडे, नवीन शेवा, डोंगरी, पाणजेसह इतर ग्रामपंचायत हद्दीतील एकूण १० गावांतील २१ हजार ४६९ लोकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम करीत आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे.

शासनाच्या निकषांवर आधारित आवश्यक असलेली डॉक्टर, समुपदेशन अधिकारी (सीएचओ), एएनएम (परिचारिका) आणि आरोग्यसेवक यांची रिक्त पदे भरण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नवघर गावातील नरेश भोईर यांनी केली आहे.

# श्री स्वामीनारायण गुरुकुल शाळेत शैक्षणिक ब्रिज कोर्स सुरू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री स्वामीनारायण गुरुकुल शाळेत विद्यार्थ्यांनी वर्षभरात त्यांचे कौशल्य किती विकसित केले आहे, याची चाचपणी करण्यासाठी ब्रिज कोर्स घेण्यात येत आहे. या उजळणीमध्ये एखादा विद्यार्थी पुढील वर्गामध्ये जात असताना, त्याला मागील वर्गातील अभ्यास कितपत समजला आहे, तसेच पुढील वर्गासाठी आवश्यक असलेली मागील वर्षातील धड्यांची उजळणी घेण्यात येणार आहे.



मागील दहा दिवसांपासून हा ब्रिज कोर्स सुरू आहे. या ब्रिज कोर्समध्ये विद्यार्थ्यांना रोज पाण्यात पोहण्याचे धडे, कोडिंग, आर्ट, क्राफ्ट, संगीत, नृत्य, संस्कृत, मराठी, गणित विषयाचा पाया मजबूत कसा करावा, मानसिक क्षमता कशी वाढवावी, इंग्रजी भाषा परिपूर्ण कशी बोलायची, वेगवेगळ्या लिपी, हिंदी, विज्ञान, रोबोटिक्स तंत्रज्ञान, आयआयटी, सद्विद्या व संतवाणी या विविध विषयांवर नर्सरी ते इ. नववीच्या विद्यार्थ्यांना धडे दिले जात आहेत.

# अवैध गावठी दारूच्या अड्ड्यांवर कारवाई

**पनवेल** : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क रायगड अधीक्षक आर. आर. कोले यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक, मुरूड व त्यांचे पथक, निरीक्षक पनवेल ग्रामीण, तसेच निरीक्षक भरारी पथक क्रमांक २ पनवेल यांनी संयुक्तपणे खालापुरातील नावंडे, कर्जतमधील पळसदरी, माणगावातील बेकरे गाव, मुरूडमधील टिटवी गाव, तसेच पेणमधील राधे गावाच्या खाडीकिनारी हातभट्टी निर्मितीच्या ठिकाणांवर धाडी टाकून अवैध हातभट्टी गावठी दारूनिर्मितीचे अड्डे उद्ध्वस्त केले.

या कारवाईत एकूण नऊ ठिकाणी छापे मारून हातभट्टी निर्मितीचे साहित्य, ९६ लिटर तयार गावठी दारू तसेच १७,८४० लिटर नवसागर व गुळमिश्रीत रसायन असा एकूण रू. आठ लाख दोन २६० किंमतीचा मुद्देमाल व तीन आरोपींना ताब्यात घेण्यात आले. अधिकारी व कर्मचाऱ्यांची चाहूल लागताच काही आरोपी हे घटनास्थळावरून पसार होण्यात यशस्वी झाले. त्यांच्याविरूद्ध संबंधित विभागच्या निरीक्षक कार्यालयाकडून गुन्हे नोंद करण्यात आलेले असून विभागील अधिकारी त्यांच्या कर्मचाऱ्यांसोबत फरार आरोपीचा शोध घेत आहेत.

# लोकसभा निवडणुकीसाठी पनवेलमध्ये अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**पनवेल : वार्ताहर**

जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड किसन जावळे यांच्या आदेशानुसार मावळ लोकसभा मतदारसंघाच्या १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघामधील दोन हजार ७९५ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी १२ व १३ एप्रिलदरम्यान चार सत्रात छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, शेडूंग येथे ऑडिओ व्हिज्युअल प्रशिक्षण व ईव्हीएम हँण्ड्स ऑन ट्रेनिंग आयोजित करण्यात आले आहे.



दोन सत्रात शुक्रवारी (दि.१२) एक हजार ४०० अधिकारी व कर्मचाऱ्यांना मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांचे उपस्थितीत राहुल मुंडके उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मावळ यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्याबाबत व ईव्हीएम मशिनबाबत तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाच्या ठिकाणी जागोजागी दिशादर्शक फलक, हजेरी नियोजन फलक लावण्यात आले होते, तसेच वैद्यकीय पथकाचीदेखील प्रशिक्षणाच्या ठिकाणी उपलब्धता होती. येणाऱ्या प्रशिक्षणार्थींच्या पार्किंगसाठी व्यवस्था करण्यात आली होती. प्रशिक्षणासाठी आलेल्या सर्व प्रशिक्षणार्थींना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चहा व नाश्ताची व्यवस्था करण्यात आलेली होती. एकंदरीत प्रशिक्षण व प्रशिक्षणाचे नियोजन हे चांगल्या प्रकारे केलेले होते.

सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राहुल मुंडके यांनी स्वत: अतिशय साध्या व सोप्या भाषेमध्ये निवडणूक कर्तव्याबाबत चांगल्या प्रकारे प्रशिक्षण दिले. ईव्हीएम मशिन हाताळणी कशी करावी याबाबत सर्व निवडणूक क्षेत्रिय अधिकारी व मास्टर ट्रेनर्स यांनी काम पाहिले तर व्यवस्थापक म्हणून तहसीलदार पनवेल विजय पाटील व त्यांचे सर्व सहकारी नायब तहसीलदार यांनी कामकाज सांभाळले. एकूणच प्रशिक्षण व्यवस्थेबाबत सर्व मतदान अधिकारी कर्मचारी व सर्व प्रशिक्षणार्थी यांनी प्रशिक्षणाचे नियोजन व प्रशिक्षणाबाबत समाधान व्यक्त केले.

एकूणच प्रशिक्षण वर्गात सहभागी कर्मचाऱ्यांचा प्रतिसाद व उत्साह चांगला होता, असे तहसीलदार विजय पाटील यांनी सांगितले.

# वाढत्या उष्णतेमुळे पाळीव जनावरेही हैराण

## पशुपालकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एप्रिल महिना सुरू होताच उन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढू लागला आहे. मनुष्याप्रमाणे पाळीव प्राण्यांनाही उष्माघात होऊ शकतो. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या पाळीव जनावरांची काळजी घ्यावी, असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढली आहे. वाढत्या तापमानामुळे एप्रिल महिना सुरू होताच पाळीव, तसेच भटक्या, जंगली प्राण्यांचे हाल होत आहेत. नेहमी अन्न शोधण्यासाठी वणवण भटकणारे प्राणी झाडांच्या सावलीचा आधार घेत आहे. दुपारच्या वेळेस वृक्षांच्या दाट छायेखाली संथपणे रवंथ करीत ठिकठिकाणी पशू दिसत आहेत. उन्हामुळे पशू-पक्ष्यांसह सर्व सजिवांचे हाल होत आहेत. यामुळे दुधाळ जनावरांच्या दुग्धशक्तीत आणि वर्तनातही बदल झाला आहे. अशा परिस्थितीत या हंगामात दुधाळ जनावरांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे, जेणेकरून दूध उत्पादनात घट होणार नाही.

हिवाळ्याच्या तुलनेत उन्हाळ्यात दूध उत्पादन कमी होत असले तरी त्यांना योग्य प्रकारे आहार, गोठ्याची रचना आणि उपचार दिल्यास दूध उत्पादनात फारशी घट होत नाही.



**गोठ्यात खेळती हवा, जास्त खिडक्या असाव्यात. पंख्यांची सोय किंवा फॉगिंग केले तरी उत्तम. जनावरांना दररोज दिवसा अंघोळ घालावी. जनावरांना पुरेसे आणि दिवसातून तीन-चार वेळा थंड पाणी द्यावे. पाण्यात थोडे मीठ आणि मैदा टाकून जनावराला द्यावे. जनावरांना सकाळ-संध्याकाळ चरायला पाठवावे. या उपाययोजना केल्यास उन्हाळ्यात जनावरांचे आरोग्य चांगले राहील.**

**-सुनील कातकाडे,**
**पशुवैद्यकीय अधिकारी, पनवेल**

# पाण्यावरून सोसायटीत वाद; महिलेची पोलिसांत तक्रार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिडको वसाहतींमध्ये उन्हाळ्याच्या दिवसांत पिण्याचे पाणी कमी असल्याने गृहनिर्माण संस्थेमधील सदस्यांचे वारंवार आपसांत पाणी सोडण्याच्या वेळेवरून भांडणे होत आहेत. तळोजा वसाहतीमधील फेज १मधील सेक्टर ९ येथील शंखेश्वर सरदार या गृहनिर्माण संस्थेच्या सचिव आणि एका महिलेचे जोरदार भांडण झाले. या भांडणाची तक्रार अखेर संबंधित महिलेने तळोजा पोलीस ठाण्यात नोंदविली आहे.

शुक्रवारी रात्री साडेआठ वाजता शंखेश्वर सोसायटीमधील ३१ वर्षीय महिला सदस्याने शौचालयात पाणी पाहिजे म्हणून इमारतीच्या रखवालदाराकडे संपर्क साधून पाणी सोडण्याची विनंती केली, मात्र इमारतीमध्ये पाणी सोडण्याची वेळ ठरविली गेली असल्याने सचिवाने रखवालदाराला फोनवरून पाणी सोडू नको असे सांगितले. त्यानंतर सचिवाने तक्रारदार महिलेला शिवीगाळ करून धमकी दिल्याची तक्रार या महिलेने पोलिसात नोंदविली आहे.


सिडको महामंडळ तळोजा परिसरात अजून १५ हजार घरे बांधत आहे. अगोदर भोगवटा प्रमाणपत्र दिलेल्या घरांना सिडको मंडळाने पाणी पुरवावे त्यानंतर नव्या घरांना भोगवटा प्रमाणपत्र देण्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे.


सिडको महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल हे सिडकोवासीयांची पाणी समस्या सोडविण्यासाठी लवकर काही मार्ग काढतील, अशी अपेक्षा रहिवाशांमधून व्यक्त होत आहे.

# ‘दोस्त’ @ ५०


## गाडी बुला रही है....


झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक







पारंपरिक लोकप्रिय चित्रपटातील एक हुकमी गोष्ट, मैत्री अथवा दोस्ती (फ्रेन्डशीप), चित्रपटाचे नाव, थीम (अर्थात गोष्ट), संवाद, गाणी यातून मोठ्याच प्रमाणावर रुपेरी पडद्यावर ’मैत्री’चा छान प्रवास आहे.

दोस्ती, संगम, नमक हराम, शोले, आदमी सडक का, साजन, दिल चाहता है, जिंदगी नही मिलेगी दोबारा, दो यार, यारों का यार, दोस्ताना, दोस्त दुश्मन अशा अनेक चित्रपटांत मैत्रीच्या अनेक गोष्टी दिसल्या. विशेष म्हणजे ’मैत्रीची गोष्ट’ असलेले अनेक चित्रपट सुपरहिट. (चित्रपटाच्या यशाचा असा हुकमी फॉर्मुला नसतो. अमूक अमूक केले की हाऊसफुल्ल गर्दी होते याचे कोणतेही मेजरमेंट वा थर्मामीटर नाही, पण प्रत्यक्ष समाजात मैत्री घटक माणसाला जणू एक प्रकारचा ऑक्सिजन देत असल्याने पडद्यावरच्या मैत्रीत स्वतःला पाहत असावेत. हा एक प्रकारचा वास्तववाद.)

जहा यार नही वहा प्यार नही, जहा प्यार नही वहा यार नही असे मैत्रीवरचे संवाद कायमच गाजले. (नमक हराम) दिये जलते है, फुल खिलते है, बडी मुश्किल से मगर दोस्त मिलते है (नमक हराम), यह दोस्ती हम नहीं तोडेंगे (शोले), बने चाहे दुश्मन जमाना हमारा सलामत रहे दोस्ताना हमारा यासारखी घट्ट मैत्रीची गाणी फ्रेन्डशीप डेला हुकमी. त्याच वेळेस दोस्त दोस्त ना रहा, प्यार प्यार ना रहा (संगम), दुश्मन ना करे दोस्त ने ये काम किया है (आखिर क्यू) अशीही मैत्रीची वेगळी बाजू दाखवणारी गाणी आली.

या सगळ्या ’मैत्री’च्या गोष्टीतील एक चित्रपट सुचित्रा चित्रचा दोस्त. मुंबईत रिलीज १२ एप्रिल १९७४. म्हणजे पन्नास वर्ष पूर्ण. मुंबईत मेन थिएटर गंगामध्ये रौप्य महोत्सवी यश.

या चित्रपटाचे निर्माते प्रेमजी आणि दिग्दर्शक दुलाल गुहा यांनी दुश्मन (१९७२)च्या खणखणीत यशानंतर दोस्त या चित्रपटावर लक्ष केंद्रित केले. विशेष उल्लेखनीय गोष्ट, ’दुश्मन’चा नायक सुपरस्टार राजेश खन्नाच्या हस्ते ’दोस्त’चा १ जून १९७२ रोजी मुहूर्त केला. धर्मेंद्रचा अजून पूर्णपणे ही मॅन झाला नव्हता. सोबर धर्मेंद्र कात मात्र टाकत होता. तरी हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित ’सत्यकाम’, मोहन सैगल दिग्दर्शित ’देवर’, प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित ’नया जमाना’ अशा चित्रपटातील त्याच्या व्यक्तीरेखा आदर्शवादी होत्या. एक प्रकारचा तो समाजसुधारक साकारत होता. त्या काळाचा महिमा सत्यवचनी होता. ढिश्यूम ढिश्यूम संस्कृती अजून पूर्ण स्वीकारलेली नव्हती. नेमक्या त्याच्या याच प्रतिमेनुसार ’दोस्त’मधील त्याची भूमिका होती. त्याने चित्रपट तर स्वीकारला. आपली हुकमी नायिका हेमा मालिनी आणि शत्रुघ्न सिन्हासोबत त्याने भरपूर सहकार्यही केले. चित्रपट पूर्ण झाल्यावर त्याची आपले कुटुंबीय व काही मित्र यांच्यासह ट्रायल पाहताना धर्मेंद्रला वाटले आपला हा चित्रपट स्वीकारण्याचा निर्णय चुकला. चित्रपट अगदीच आदर्शवादी आहे आणि आपण आता मात्र (विशेषत: नोव्हेंबर १९७३मध्ये रिलीज झालेल्या नासिर हुसेन दिग्दर्शित ‘यादों की बारात’च्या हाऊसफुल्ल यशानंतर) आपल्याला अशा सोबर भूमिकेत रसिक स्वीकारतील काय? आणि चित्रपटही त्याला व त्याच्या कुटुंबियांना फारसा भावला नाही. म्हणून तो चित्रपट प्रदर्शित व्हायच्या आधीच कश्मीरला अन्य एका चित्रपटाच्या शूटिंगसाठी गेलादेखील. आता चित्रपट प्रदर्शित झाला. त्या काळात अनेक चित्रपट माऊथ पब्लिसिटीवर हळूहळू यशस्वी वाटचाल करीत. ’दोस्त’चेही तेच होत होते. एक दोन आठवड्यानंतर कश्मीरमध्ये चित्रपट प्रदर्शित झाला आणि तो पाहिलेले काही चित्रपट शौकीन धर्मेंद्रला त्याच्या सेटवर भेटायला आले आणि ’दोस्त’ चित्रपट आवडला. हाऊसफुल्ल गर्दीत सुरू आहे असे सांगताच धर्मेंद्र सुखावला, खुलला (तसा तो फारच भावनाप्रधान, संवेदनशील आहे). त्याने शूटिंगमधून वेळ काढून तिकडेच हाऊसफुल्ल गर्दीत ’दोस्त’ पाहताना तो पब्लिक रिस्पॉन्स पाहून अचंबित झाला. त्याने लगेचच दोन दिवसांची सुट्टी घेऊन मुंबईत येणे पसंत केले. मुंबईत येताच विमानतळावरुन तो थेट दुलाल गुहांच्या घरी गेला. दुलाल गुहाच्या मुलाने दरवाजा उघडताच त्याच्या लक्षात आले, धर्मेंद्र रात्रभर जागाच असावा. मुलाची भेट घेऊन धर्मेंद्र आत गेला. दुलाल गुहाच्या आईला भेटला. आपण चुकलो म्हणाला. तेवढ्यात दुलाल गुहा आल्यावर धर्मेंद्रने जवळपास त्याच्या पायावर लोटांगण घातले. माफी मागितली. आपल्या कुटुंबियांना चित्रपटातील काही कळत नाही म्हणाला. दुलाल गुहाने त्याची अवस्था पाहून त्याला भरपूर चहा नाश्ता दिला. धर्मेंद्रने तेथूनच आपला भाऊ अजितसिंग याला फोन करून पंजाबी भाषेत काही सांगितले.

(पूर्वी आपलं चुकले हे मान्य करणारे कलाकार होते. त्यांचे माणूसपण कायम होते.) अजितसिंग देवल याला पन्नास हजार रुपये घेऊन दुलाल गुहांच्या घरी आला. (पन्नास वर्षांपूर्वीचे पन्नास हजार म्हणजे आजचे किमान पन्नास लाख म्हणायला हवेत.) हे पैसे होते धर्मेंद्रच्या विजयता फिल्म या चित्रपट निर्मिती संस्थेचा नवीन चित्रपट दुलाल गुहा दिग्दर्शित करणार याचे. तो चित्रपट होता ’प्रतिज्ञा’. अजितसिंग देवलकडे एक कथा कल्पना होती, नायकाची (धर्मेंद्र) आई त्याला मरण्यापूर्वी सांगते, तुझ्या पोलीस खात्यात असलेल्या वडिलांना तुझ्या अगदी लहानपणीच डाकूंनी मारले.

अतिशय झपाट्याने हा चित्रपट पूर्ण करीत २३ जून १९७५ रोजी हा प्रदर्शित करताना ’दोस्त’चे मेन थिएटर गंगामध्येच हा चित्रपट प्रदर्शित केला.

’दोस्त’ची थीम काय? अनाथ मानवला (धर्मेंद्र) एका फादर फ्रान्सिस यांनी (अभी भट्टाचार्य) दत्तक (गोद) घेतलेय. ते त्याच्यावर ’चांगला माणूस म्हणून कसे असावे, जगावे याचे खोलवर संस्कार करतात.’ मानव शिक्षणासाठी शहरात येतो व शिक्षण पूर्ण झाल्यावर तो फादरना भेटायला गेल्यावर त्याला समजते त्यांचा मृत्यू झाला आहे. आता तो पुन्हा शहरात यायचा निर्णय घेतो. एक्स्प्रेस ट्रेनने प्रवास करीत असताना त्याची ओळख गोपीचंद (शत्रुघ्न सिन्हा) याच्याशी होते. गोपीचंदचा डोळा मानवच्या बॅगेवर असतो. त्यात भरपूर पैसा असेल असे गोपीचंदला मनोमन वाटते आणि तो ट्रेनचा वेग कमी होताच ती बॅग घेऊन पळतो. मानवला हा धक्काच असतो, तोही ट्रेनमधून उतरून गोपीचंदचा पाठलाग करून त्याला पकडतो. दोघांमध्ये झटापट होते. थोडे शांत झाल्यावर मानव त्याला सरळमार्गी, आदर्शवादी, प्रामाणिक, स्वच्छ आयुष्याचे महत्त्व समजावून सांगतो. यातून त्यांचे नवीन नाते निर्माण होते. मानव मुंबईत नोकरीच्या शोधात भरपूर फिरतो. त्यात त्याला बरेच बरे वाईट अनुभव येतात. अशातच त्याला गुप्ता (रेहमान) यांची मुलगी काजल (हेमा मालिनी) आवडते. पुढे काही घटना घडत घडत चित्रपट पुढे सरकतो. सचिन भौतिक यांची ही पटकथा आहे. चित्रपटातील गीत संगीत लोकप्रिय झाले. आनंद बक्षी यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत आहे. गाडी बुला रही है (पार्श्वगायक किशोरकुमार) सर्वकालीन लोकप्रिय. कैसे जीते है भला (लता मंगेशकर, मोहम्मद रफी व शत्रुघ्न सिन्हा), आ बता दे के तुझे कैसे जीया जाता है (लता मंगेशकर व मोहम्मद रफी) या गाण्यांनी या आदर्शवादी चित्रपटातील रंजकता वाढली. चित्रपट त्यामुळेच चर्चेत राहिला आणि मग लोकप्रिय ठरला.

या चित्रपटापूर्वी निर्माते प्रेमजी यांनी ’मेरा साया’ (१९६६) व ’चिराग’ (१९६९) या दोन्ही चित्रपटांचे दिग्दर्शन राज खोसला यांचे आहे तसेच दुलाल गुहा दिग्दर्शित ’दुश्मन’ (१९७२) या चित्रपटांची निर्मिती केली. ते दिलीपकुमारचे सेक्रेटरी होते. ’दोस्त’नंतर रवि टंडन दिग्दर्शित ’मजबूर’ इत्यादी चित्रपटांची निर्मिती केली. दिग्दर्शक दुलाल गुहा यांनी ’धरती कहे पुकार के’ (१९६९), ’मेरे हमसफर’ (१९७०), ‘दुश्मन’ (१९७२) यानंतर ’दोस्त’चे दिग्दर्शन केले. त्यानंतर ’दो अन्जाने’ वगैरे चित्रपटांचे दिग्दर्शन केले.

’दोस्त’ म्हणताक्षणीच गाडी बुला रही है, शिटी बजा रही है हा गाण्याचा मुखडा आठवणारच आणि मग ’चलना ही जिंदगी है, चलती ही जा रही है’ हे आयुष्याचे तत्वज्ञानही मनोमन पटणार. ते जास्त महत्त्वाचे...

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ नाव भीमराव होते. त्यांचे वडील श्री रामजी वल्द मालोजी सकपाळ हे महू येथेच मेजर सुभेदार पदावरील लष्करी अधिकारी होते. त्यांनी आणि त्यांची पत्नी भीमाबाई यांनी त्यांच्या सेवेची शेवटची वर्षे काली पलटण येथील जन्मस्थान स्मारकाच्या जागेवर असलेल्या बॅरेकमध्ये घालवली. १८९१मध्ये १४ एप्रिल रोजी रामजी सुभेदार कर्तव्यावर असताना रात्री १२ वाजता भीमरावांचा जन्म झाला. त्यांचा प्रारंभिक काळ कबीरपंथी वडील आणि धार्मिक आईच्या कुशीत शिस्तबद्ध होता.

बालक भीमराव यांचे प्राथमिक शिक्षण दापोली व सातारा येथे झाले. १९०७मध्ये त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन स्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. या वेळी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला व भेट म्हणून त्यांचे शिक्षक कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी त्यांना ’बुद्ध चरित्र’ हा स्वलिखित ग्रंथ भेट म्हणून दिला. भीमरावांनी बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांच्याकडून फेलोशिप मिळाल्यानंतर १९१२मध्ये मुंबई विद्यापीठातून पदवी प्राप्त केली.

बीएनंतर एमए अध्ययन हेतू बडोदा नरेश सयाजी गायकवाड यांची पुन्हा फेलोशिप मिळाल्यानंतर भीमरावांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात शिक्षणासाठी प्रवेश घेतला. १९१५मध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवीची परीक्षा उत्तीर्ण केली. त्यासाठी त्यांनी ’कॉमर्स ऑफ एन्शेंट इंडिया’ हा प्रबंध लिहिला. त्यानंतर १९१६मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून त्यांनी पीएचडी उपाधी प्राप्त केली. ’ब्रिटिश भारतातील प्रांतीय वित्ताचे विकेंद्रीकरण’ हा संशोधनाचा विषय होता.

फेलोशिप पूर्ण केल्यानंतर त्यांना भारतात परतावे लागले. त्यामुळे ते ब्रिटनमार्गे परतत होते. तिथल्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्समध्ये त्यांनी एमएससी आणि डीएससी आणि लॉ इन्स्टिटयूटमध्ये बार-एट-लॉ पदवीसाठी नोंदणी केली आणि भारतात परतले. सर्वप्रथम शिष्यवृत्तीच्या अटीनुसार त्यांनी बडोद्याच्या राजाच्या दरबारात लष्करी अधिकारी आणि आर्थिक सल्लागार ही जबाबदारी स्वीकारली. संपूर्ण शहरात कोणीही त्याला कामावर घेण्यास तयार नसल्याच्या गंभीर समस्येमुळे तो काही काळानंतर मुंबईत परत आले.

परळ येथे डबक चाळ आणि कामगार वसाहतीत अर्धवेळ अध्यापन आणि वकिली करून अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी तेथे राहत होते आणि पत्नी रमाबाई यांच्यासोबत राहत होते. १९१९मध्ये डॉ. आंबेडकरांनी राजकीय सुधारणांसाठी स्थापन केलेल्या साऊथबरो कमिशनसमोर राजकारणात दलित प्रतिनिधित्वाच्या बाजूने पुरावे दिले. अशिक्षित आणि गरीब लोकांना जागरूक करण्यासाठी त्यांनी मूकनायक आणि बहिष्कृत इंडिया या साप्ताहिकांचे संपादन करून मूक आणि अशिक्षित आणि गरीब लोकांना जागरूक केले आणि आपले अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते लंडन आणि जर्मनी येथे गेले आणि तेथून एमएससी, डीएससी आणि बॅरिस्टर पदव्या प्राप्त केल्या. त्यांच्या एमएस्सीचे संशोधनाचे विषय होते इम्पीरियल फायनान्सच्या प्राप्य विकेंद्रीकरणाचा विश्लेषणात्मक अभ्यास आणि त्यांच्या डीएससी पदवीचा विषय रुपयाची समस्या, त्याची उत्पत्ती आणि उपाय आणि भारतीय परिसंचरण आणि बँकिंगचा इतिहास होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबिया विद्यापीठाने एलएलडी आणि उस्मानिया विद्यापीठाने डी. लिट. या मानद पदवी बहाल केल्या. अशा प्रकारे डॉ. आंबेडकर जागतिक तरुणांसाठी प्रेरणास्थान बनले, कारण त्यांनी बीए, एमए, एमएससी, पीएचडी, बॅरिस्टर, डीएससी, डी.लिट. एकूण २६ शीर्षके संबंधित आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या ६५ वर्षांच्या आयुष्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक, घटनात्मक अशा विविध क्षेत्रात अगणित कार्य करून राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

मानवधिकार जसे दलित आणि दलित आदिवासींचा मंदिर प्रवेश, पिण्याचे पाणी, अस्पृश्यता, जात यांसारख्या सामाजिक दुष्कृत्यांचे निर्मूलन या मानवी हक्कांसाठी मनुस्मृती दहन (१९२७), महाड सत्याग्रह (वर्ष १९२८), नाशिक सत्याग्रह (वर्ष १९३०) येवला की गर्जना (वर्ष १९३५), सारखे आंदोलन केले.

आवाजहीन, शोषित आणि अशिक्षित लोकांना जागृत करण्यासाठी त्यांनी १९२७ ते १९५६ या काळात मूक नायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत या पाच साप्ताहिक आणि पाक्षिकांचे संपादन केले.

कमजोर वर्गाचे विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, रात्रशाळा, ग्रंथालये आणि शैक्षणिक उपक्रमांद्वारे दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना एकाच वेळी अभ्यास करण्यास आणि उत्पन्न मिळविण्यास सक्षम करणे. १९४५मध्ये त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून मुंबईत सिद्धार्थ महाविद्यालय आणि औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. बौद्धिक, वैज्ञानिक, प्रतिष्ठेने १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपुरात पाच लाख लोकांसह भारतीय संस्कृतीसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली आणि त्यांच्या शेवटच्या पुस्तक The Buddha and His Dhammaद्वारे भारतात बौद्ध धर्माची पुनर्स्थापना करण्याचा मार्ग मोकळा केला. जातपंत तोडक मंडळ (वर्ष १९३७) लाहोर, त्यांच्या प्रबंधाच्या संमेलनासाठी तयार करण्यात आले. त्यांच्या जातिभेद निर्मूलन या ग्रंथाने भारतीय समाजाला धर्मग्रंथांमध्ये प्रचलित असलेल्या मिथक, अंधश्रद्धा आणि अंधश्रद्धेपासून मुक्त करण्याचे कार्य केले. हिंदू विधेयक संहितेच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना घटस्फोट, मालमत्तेत उत्तराधिकार इत्यादींची तरतूद करून त्याच्या अंमलबजावणीसाठी आयुष्यभर संघर्ष केला.

### भारतातील आर्थिक, वित्तीय आणि प्रशासकीय योगदान

* डॉ. आंबेडकर यांनी लिहिलेल्या मजकुराच्या आधारे, रुपयाची समस्या-त्याचे मूळ आणि उपाय आणि भारतीय बँकिंग आणि बँकिंगचा इतिहास, ग्रंथ आणि हिल्टन यंग कमिशनच्या समक्ष त्यांचे पुरावे या आधारावर १९३५मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना केली गेली.
* ’ब्रिटिश भारतातील प्रांतीय वित्ताचा विकास’ या त्यांच्या दुसऱ्या संशोधन कार्याच्या आधारे देशात वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली.
* शेतीमध्ये सहकारी शेतीच्या माध्यमातून उत्पादनात वाढ करणे, सतत वीज व पाणीपुरवठा करणे यावर उपाय सांगितले.
* औद्योगिक विकास, पाणी साठवण, सिंचन, उत्पादकता आणि कामगार आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, सामूहिक आणि सहकारी प्रगतीशील शेती, राज्याच्या मालकीसह सार्वभौम समाजवादी प्रजासत्ताकची स्थापना आणि जमिनीचे राष्ट्रीयीकरण.
* १९४५मध्ये त्यांनी महानदीच्या व्यवस्थापनाची बहुउद्देशीय उपयुक्तता आणि औद्योगिकीकरणाची बहुउद्देशीय आर्थिक धोरणे आणि नद्या-नाले जोडणारे जल धोरण, हिराकुड धरण, दामोदर खोरे धरण, सोन नदी खोरे प्रकल्प, राष्ट्रीय जलमार्ग, केंद्रीय जल आणि विद्युत प्राधिकरणाचा मार्ग मोकळा केला.
* १९४४मध्ये प्रस्तावित केंद्रीय जलमार्ग आणि सिंचन आयोगाच्या प्रस्तावाला व्हाईसरॉयने ४ एप्रिल १९४५ रोजी मान्यता दिली आणि भारतात मोठ्या धरणाच्या तंत्राच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावित केले.
* त्यांनी भारताच्या विकासासाठी मजबूत तांत्रिक संघटनेची नेटवर्क रचना मांडली.
* त्यांनी जलव्यवस्थापन आणि विकासाचा मार्ग मोकळा करून देशाच्या सेवेसाठी नैसर्गिक संसाधनांचा अर्थपूर्ण वापर केला.

### संविधान आणि राष्ट्र निर्माण

त्यांनी दोन वर्षे, ११ महिने आणि १७ दिवसांच्या अथक परिश्रमाने समता, समता, बंधुता आणि मानवतेवर आधारित भारतीय संविधान तयार केले आणि २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सुपूर्द केले. देशातील सर्व नागरिकांना राष्ट्रीय एकात्मता, व्यक्तीच्या अखंडतेच्या आणि प्रतिष्ठेच्या जीवनपद्धतीने भारावून गेलेली भारतीय संस्कृतीने अभिभूत केले.

१९५१मध्ये त्यांनी हिंदू कोड ऑफ वुमन एम्पॉवरमेंट विधेयक मंजूर होण्यासाठी प्रयत्न केले आणि ते मंजूर झाले नाही तेव्हा त्यांनी स्वतंत्र भारताच्या पहिल्या कायदा मंत्री पदाचा राजीनामा दिला. सन १९५५मध्ये त्यांचा Thoughts on Linguistic States हा ग्रंथ प्रकाशित करून, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र या राज्यांची पुनर्रचना करून छोट्या आणि आटोपशीर राज्यांमध्ये पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव ठेवला होता, जो ४५ वर्षांनंतर काही प्रदेशांमध्ये प्रत्यक्षात आला.

निवडणूक आयोग, नियोजन आयोग, वित्त आयोग, महिला आणि पुरुषांसाठी एकसमान नागरी हिंदू संहिता, राज्य पुनर्रचना, मोठ्या राज्यांचे लहान आकारात संघटन, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे, मूलभूत अधिकार, मानवाधिकार, नियंत्रक आणि महालेखा परीक्षक, निवडणूक आयुक्त आणि राजकीय संरचना मजबूत करण्यासाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि परराष्ट्र धोरण तयार केले.

लोकशाही बळकट करण्यासाठी राज्याची तीन अंगे, न्यायपालिका, कार्यपालिका आणि विधिमंडळ या स्वतंत्र आणि स्वतंत्र केल्या गेल्या आणि समान नागरी हक्कांनुसार एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य हा घटक सुरू करण्यात आला.

विधिमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिकेत अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांचा सहभाग घटनेने निश्चित केला आणि भविष्यात ग्रामपंचायत, जिल्हा पंचायत, पंचायत राज इत्यादी कोणत्याही प्रकारच्या विधिमंडळात सहभागी होण्याचा मार्ग मोकळा केला.

सहकारी आणि सामूहिक शेतीबरोबरच, उपलब्ध जमिनीचे राष्ट्रीयीकरण करून, सार्वजनिक प्राथमिक उपक्रम जसे की बँकिंग, विमा इत्यादी राज्यांच्या नियंत्रणाखाली ठेवून जमिनीवर राज्याची मालकी प्रस्थापित करण्याची आणि अल्प शेतीधारकांवर अवलंबून असलेल्या बेरोजगार मजुरांना रोजगार देण्याची त्यांनी जोरदार शिफारस केली. अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी औद्योगिकीकरणाची देखील शिफारस केली.

व्हाईसरॉय कौन्सिलमध्ये कामगार मंत्री म्हणून शिक्षण, सामाजिक सुरक्षा आणि कामगार कल्याण, कामगार कल्याण १२ तासांवरून आठ तास कामाचे तास, समान काम, समान वेतन, प्रसूती रजा, पगारी रजा, कर्मचारी राज्य विमा योजना, आरोग्य सुरक्षा, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ तयार करणे, कामगार आणि दुर्बल घटकांच्या हितासाठी आणि सत्तेत थेट सहभागासाठी स्वतंत्र मजदूर पक्षाची स्थापना करुन १९३७च्या मुंबई अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी १७पैकी १५ जागा जिंकल्या.

कर्मचारी राज्य विमा अंतर्गत, आरोग्य, रजा, अपंगत्व-समर्थन, काम करत असताना अपघाती घटनेमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई आणि इतर अनेक संरक्षणात्मक सुविधा कामगार कल्याणामध्ये समाविष्ट आहेत. कर्मचार्यांना दैनंदिन भत्ता, अनियमित कर्मचाऱ्यांना रजेची सुविधा, कर्मचाऱ्यांच्या वेतन श्रेणीचा आढावा, भविष्य निर्वाह निधी, १९४४मध्ये कोळसा खाणीत काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षा दुरुस्ती विधेयक आणि अभ्रक खाणकामात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

१९४६मध्ये त्यांनी रहिवासी, पाणीपुरवठा, शिक्षण, करमणूक, सहकार व्यवस्थापन आदींपासून कामगार कल्याण धोरणाचा पाया घातला आणि आणि भारतीय कामगार परिषदेची सुरुवात केली जी आतापर्यंत सुरू आहे, ज्यात दरवर्षी मजुरांच्या ज्वलंत प्रश्नांवर पंतप्रधानांच्या उपस्थितीत चर्चा करून ते सोडवण्याचा प्रयत्न केला जातो.

कामगार कल्याण निधीच्या अंमलबजावणीसाठी एक सल्लागार समिती स्थापन करून जानेवारी १९४४मध्ये कार्यान्वित करण्यात आले. भारतीय सांख्यिकी कायदा संमत करण्यात आला, ज्यामुळे कामगार परिस्थिती, दैनंदिन मजुरी, उत्पन्नाचे इतर स्त्रोत, महागाई, पत, गृहनिर्माण, रोजगार, ठेवी आणि इतर निधी आणि कामगार विवादांशी संबंधित नियम शक्य झाले.

८ नोव्हेंबर १९४३ रोजी त्यांनी १९२६पासून प्रलंबित असलेला भारतीय कामगार कायदा सक्रिय केला आणि त्या अंतर्गत भारतीय ट्रेड युनियन दुरुस्ती विधेयक प्रस्तावित केले आणि कामगार संघटनेची कडक अंमलबजावणी केली. कामगारांच्या कल्याणासाठी आरोग्य विमा योजना, भविष्य निर्वाह निधी कायदा, कारखाना दुरुस्ती कायदा, कामगार विवाद कायदा, किमान वेतन कायदा आणि कायदेशीर संप कायदे करण्यात आले. **(साभार : पीआयबी)**

# अलिबाग येथे वॉक फॉर वोट रॅली

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते शुभारंभ





**रायगड : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ मतदानाबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. पथनाटच, प्रभातफेरीद्वारे नागरिकांमध्ये मतदानासाठी प्रेरित केले जात आहे. याचा जिल्ह्यातील मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी चांगला उपयोग होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले.

वॉक फॉर वोट रॅलीचा शुभारंभ शनिवारी (दि.१३) जिल्हाधिकारी जावळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. वॉक फॉर वोट रॅलीसाठी जिल्हाधिकारी जावळे यांच्यासह उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी निर्मला कुचिक, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे, तहसीलदार विक्रम पाटील, अलिबाग नगर परिषद मुख्याधिकारी अंगाई साळुंखे आदी उपस्थित होते. या वेळी अंगणवाडीसेविका वैशाली पाटील यांनी लोकशाहीचा उत्सव पोवाडा सादर केला.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून सकाळी ८ वाजता सुरू झालेली रॅली त्यांच्यासह जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय येथून ब्राह्मण आळी, महावीर चौक बालाजी मंदिर नाका, बीच रोड, एसबीआय बँक या मार्गाने शहरातील विविध भागातून नेऊन जिल्हाधिकारी येथे समारोप करण्यात आला.

या वेळी रॅलीमध्ये मतदानाबाबत प्रचारगीते, चित्ररथ, फलक याद्वारे घोषणा देत व नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृतीसाठी आवाहन करण्यात आली. या रॅलीसाठी अंगणवाडीसेविका मदतनीस व आशासेविका यांसह अधिकारी, कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. सहभागी महिलांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. परिसरात उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईंटवर भेट देऊन मोठ्या प्रमाणात सेल्फी घेत होत्या. यातून जिल्ह्यातील ७ मे रोजी होत असलेल्या मतदान प्रक्रियेत सहभागी होत मतदान करण्याचा संकल्पच दिसून येत होता.

# निवडणूक खर्च निरीक्षकांची जिल्हा माध्यम कक्षास भेट

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड लोकसभा मतदारसंघ निवडणूक खर्च निरीक्षक धिरेंद्रमणी त्रिपाठी यांनी जिल्हा माध्यम कक्षात भेट देऊन जिल्हा माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला.

जिल्हा माध्यम कक्षातून निवडणूक प्रशासनाच्या वतीने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक संबंधी प्रसार माध्यम व वृत्तपत्र प्रतिनिधींशी समन्वय राखला जात आहे. यासाठी माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आले असून उमेदवारांच्या प्रचार जाहिराती याचे प्रमाणिकरण करण्याची कार्यवाही केली जाते. यासह निवडणुकीची मतदान जागृतीसाठी विविध उपक्रमांच्या प्रसिद्धीमध्ये या पक्षाचा सहभाग आहे, आदींबाबतची माहिती जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे यांनी या वेळी दिली.

त्रिपाठी यांनी माध्यम कक्षातील इलेक्ट्रॉनिक मीडिया सेल, समाजमाध्यमांद्वारे प्रसिद्धी तसेच विविध दैनंदिन अहवाल बाबत पाहणी त्यांनी केली. निवडणूक निरीक्षक त्रिपाठी यांनी सोशल मीडियावर विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले, तसेच पेडन्यूजबाबत अधिक दक्ष रहावे. उमेदवाराच्या प्रचारावर आणि प्रसिद्धी साहित्यावर होणारा खर्च, खर्च पथकाला विहित नमुन्यात सादर करावा, असेही त्यांनी सांगितले.

या वेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, खर्च पथक प्रमुख राहुल कदम, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा पिंगळे, माहिती अधिकारी किरण वाघ तसेच जिल्हा माध्यम कक्षातील कर्मचारी विठ्ठल बेंदुगडे, जयंत ठाकूर, स्वरुप हुले, अर्पणा शिंदे, क्रांती पाटील, प्रफुल पाटील, जयवंत शिंदे, श्रीमती बागाव आदी उपस्थित होते.



# रोहा पंचायत समितीकडून मतदार जागृती

**रोहे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सर्वत्र सुरू आहे. लोकशाहीच्या या उत्सवासाठी जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी निवडणूक यंत्रणा जनजागृती करीत आहे. तालुक्यात शुक्रवारी (दि.१२) राजिप केंद्रशाळा धाटाव येथील शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांच्या वतीने गावातून रॅली आयोजित करण्यात आली होती.

संपूर्ण देशभरात निवडणूक आयोगाच्या माध्यमातून जास्तीत जास्त मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने तहसीलदार कार्यालय, गटविकास अधिकारी शुभदा पाटील व गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या विविध शाळांमध्ये मतदारांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.




विद्यार्थ्यांनी मतदान जागृतीविषयक विविध घोषणा दिल्या. गावातील मध्यवर्ती चौकात रॅली आल्यानंतर विद्यार्थ्यांनी मतदान जागृतीविषयक गीतगायन केले, या माध्यमातून गावात मतदार जनजागृती करण्यात आली. जमलेल्या मतदारांनी ७ मे रोजी मतदान करण्याचे आश्वासन दिले.

# मुरूड तालुक्यातील चार ग्रामपंचायतींवर प्रशासक

**मुरूड : प्रतिनिधी**

डिसेंबर २०२३मध्ये मुदत संपणाऱ्या तालुक्यातील खारअंबोली, सावली, मजगाव, उसरोली या चार ग्रामपंचायतींच्या निवडणुका न झाल्याने या ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आली आहे.

गेल्या पाच वर्षांपूर्वी याच चार ग्रामपंचायतींच्या निवडणुका डिसेंबर महिन्यात झाल्या होत्या. याही वर्षी डिसेंबर महिन्यात निवडणूक होतील अशी शक्यता वर्तवली होती. निवडणूक आयोगाकडून पूर्ण तयारी होती. प्रभागही पाडण्यात आले होते, मात्र लोकसभा निवडणूक जाहीर झाल्याने या ग्रामपंचायतींच्या निवडणुका अद्याप जाहीर करण्यात आल्या नसल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे आता या चार ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकांकडून पाहिला जाणार आहे.

खारअंबोली व उसरोलीकरिता प्रशासक कृषि विभागाचे विस्तार अधिकारी वसंत दळवी, सावलीकरिता प्रशासक आरोग्य परिवेक्षक राजेश वाडेकर, मजगावकरिता प्रशासक विस्तार अधिकारी सांख्यिकी प्रसाद माळी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

# कार्ला यात्रेसाठी रायगडातून जादा एसटी गाड्या

**पेण** : दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील आई एकविरा देवीची कार्ला यात्रा मोठ्या उत्साहात साजरी होणार असून या यात्रेसाठी असंख्य आगरी, कोळी बांधव कार्ला येथे रवाना होत असतात. त्यामुळे एसटी महामंडळाकडून कार्ला यात्रेकरूंसाठी जादा १५ बसेसचे नियोजन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, कर्जत, पेण, रोहा, मुरूड या पाच आगारातून प्रत्येकी तीन अशा एकूण १५ जादा बसेस कार्ला यात्रेकरूंसाठी राखून ठेवल्या आहेत. १४ ते १७ एप्रिलदरम्यान या जादा बसेसचे आयोजन केले आहे. जादा बसेस कार्ला–पनवेल, कार्ला–पेण, कार्ला–अलिबाग, कार्ला–लोणावळा या मार्गावरून वाहतूक करणार असून वाहतूक घाटातून होणार असल्याने त्या दृष्टीने सुस्थितीतील गाड्यांचा वापर करावा तसेच मालमत्तेची सुरक्षा राखण्याच्या दृष्टीने पहारेकऱ्यांची नेमणूक १४ ते १७ एप्रिलपर्यंत कार्ला येथे करण्याचे आदेश रायगड एसटी महामंडळाने दिले आहेत.

**Shop For Rent**

MAIN Road Corner Shops - 500 + 500 ft Otla for **RENT**. Prime, Newbuild 16' height, touching Registration Office, Nr. D Mart, New Panvel.

**OWN - 9322399183**

# खोपोली इनरव्हील क्लबतर्फे मतदान जनजागृती



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील अणि आसपासच्या कॉलेजमध्ये इनरव्हील क्लबतर्फे मतदान करण्याचे महत्त्व सांगून त्याबद्दल पत्रके देण्यात येत आहेत, तसेच 'मी मतदान करणारच' अशी प्रतिज्ञाही कॉलेजच्या युवक–युवतींनी घेतली आहे.

इनरव्हील खोपोलीच्या सर्वच महिला सदस्य अतिशय उत्साहाने या उपक्रमात सहभागी झालेल्या आहेत. प्रत्येक सदस्य हा आपआपल्या पद्धतीने मतदान करण्याबाबत जनजागृतीचे काम करीत आहेत. या सर्व महिला खोपोलीतील अनेकविध सोसायटीत आणि आसपासच्या खेडेगावात जाऊनही मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत.

या उपक्रमाकरिता अध्यक्ष श्रीदेवी राव, उपाध्यक्ष जयश्री कलोंशी, सेक्रेटरी दीना शाह, उपक्रम प्रमुख रेवती गजेंद्रगडकर, कॉलेजमधील युवक, युवती, कॉलेज स्टाफ उपस्थित होत्या. रमीला पटेल व सुमिता महर्षि यांनी विशेष मेहनत घेतली.

# निवडणुकीसाठी मुरूड पोलीस सज्ज

**मुरूड** : मुरूड पोलीस ठाण्याच्या वतीने शनिवारी (दि.१३) आगामी लोकसभा निवडणूक व सणांच्या अनुषंगाने परेश हॉटेल नाका येथे दंगा काबू पथकातर्फे रूट मार्च घेण्यात आला.

रूट मार्च एकदरा गाव येथून सुरू होऊन बाजारपेठमार्गे, पेठ मोहल्ला, लक्ष्मी खार येथून दत्तवाडी येथे समाप्त झाला. रूट मार्च उपविभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी यांच्या मार्गदर्शाखाली पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आला. मुरूड पोलीस ठाण्यातील तीन अधिकारी, २० अंमलदार तसेच आरसीपी वडखळ येथील ३२ अंमलदार उपस्थित होते.



**दि पनवेल को.ऑप.अर्बन बँक लि. पनवेल**

४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल–४१०२०६

**ताबा नोटीस**

**( स्थावर मिळकतीसाठी )**

**( सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ नुसार)**

ज्या अर्थी

मी, श्री. नितीन जीवन पाटील. मुख्य कार्यकारी अधिकारी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल बँकेचा प्राधिकृत अधिकारी म्हणून, मला दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तीचा वापर करून कलम १३ (२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ चे नियम ९ नुसार दिनांक. ०५/०१/२०२४ रोजी कर्जदार / मोर्गेजर **श्री. दिनेश कमळाकर गोवारी** यांना मागणीच्या नोटीस नुसार रक्कम रु. १५,००,४२४/– (अक्षरी पंधरा लाख चारशे चोवीस रुपये मात्र) अधिक ०१/०१/२०२४ पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च सदर नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसाचे मुदतीत भरण्याबाबत फर्मावले होते.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार यांनी नोटीसीमध्ये मागणी केलेली रक्कम रु. १५,००,४२४/–(अक्षरी पंधरा लाख चारशे चोवीस रुपये मात्र) अधिक ०१/०१/२०२४ पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च दिलेल्या मुदतीमध्ये भरणा केली नसल्याने या नोटीशीने कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला कळविण्यात येते कि, खाली सही करणार यांनी दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्ती वापरून विशेषतः सदर कायद्याचे कलम १३ (४) व त्या खालील नियम ९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरून, खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा दि. ०८/०४/२०२४ रोजी घेतला आहे.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला या नोटीसीद्वारे ताकीद देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणताही व्यवहार करू नये तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार हा दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल यांचे बोज्यासह केला आहे असे समजले जाईल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन व तपशील**

| वर्णन | पत्ता | मालमत्ता गहाण ठेवणाऱ्या मालकाचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| घर नं. २३४/३ सदनिका क्र. ३ घर नं. २३४/४ सदनिका क्र. ४ | विचुंबे, पनवेल | दिनेश कमळाकर गोवारी | २१.२ स्क्वेअर मीटर व २९.३ स्क्वेअर मीटर |

**परिशिष्ट क्र. १**

पूर्वेस : धाऊ लडकू भिंगारकर याचे मिळकत क्र. ९८
पश्चिमेस : भागेश नंदू सुरते यांचे मिळकत क्र. ३८४
दक्षिणेस : तुकाराम कानू भोईर यांचे मिळकत क्र. ६०३
उत्तरेस : वासुदेव धर्मा भिंगारकर यांचे मिळकत क्र. ८२

**स्थळ – पनवेल**
**दि. ०८/०४/२०२४**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि**

**दि पनवेल को.ऑप.अर्बन बँक लि. पनवेल**

४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल–४१०२०६

**ताबा नोटीस**

**( स्थावर मिळकतीसाठी )**

**( सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ नुसार)**

ज्या अर्थी

मी, श्री. नितीन जीवन पाटील. मुख्य कार्यकारी अधिकारी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल बँकेचा प्राधिकृत अधिकारी म्हणून, मला दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तीचा वापर करून कलम १३ (२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ चे नियम ९ नुसार दिनांक. ०९/०१/२०२४ रोजी कर्जदार / मोर्गेजर **श्री. वैजनाथ गोपाळ पाटील** यांना मागणीच्या नोटीस नुसार रक्कम रु. ८,९८,१९२/– (अक्षरी आठ लाख अठठ्याणव हजार एकशे ब्याण्णव रुपये मात्र) अधिक ०१/०१/२०२४ पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च सदर नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसाचे मुदतीत भरण्याबाबत फर्मावले होते.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार यांनी नोटीसीमध्ये मागणी केलेली रक्कम रु. रु. ८,९८,१९२/–(अक्षरी आठ लाख अठठ्याणव हजार एकशे ब्याण्णव रुपये मात्र) अधिक ०१/०१/२०२४ पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च दिलेल्या मुदतीमध्ये भरणा केली नसल्याने या नोटीशीने कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला कळविण्यात येते कि, खाली सही करणार यांनी दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्ती वापरून विशेषतः सदर कायद्याचे कलम १३ (४) व त्या खालील नियम ९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरून खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा दि.१०/०४/२०२४ रोजी घेतला आहे.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला या नोटीसीद्वारे ताकीद देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणताही व्यवहार करू नये तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार हा दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल यांचे बोज्यासह केला आहे असे समजले जाईल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन व तपशील**

| वर्णन | पत्ता | मालमत्ता गहाण ठेवणाऱ्या मालकाचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| पनवेल महानगर पालिका हद्दीतील | सदनिका क्र.३०२, तिसरा मजला, बी विंग, शारदा स्नेहा सी सी एच, सी टी एस नं. १०३५/१ ब आणि १०३५/ब उरण नाका, पनवेल. | श्री. वैजनाथ गोपाळ पाटील | ४३५ स्क्वेअर फूट |

**स्थळ – पनवेल**
**दि. १०/०४/२०२४**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि**

**दि पनवेल को.ऑप.अर्बन बँक लि. पनवेल**

४७१, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल–४१०२०६

**ताबा नोटीस**

**( स्थावर मिळकतीसाठी )**

**( सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ नुसार)**

ज्या अर्थी

मी, श्री.नितीन जीवन पाटील. मुख्य कार्यकारी अधिकारी दि पनवेल को ऑप अर्बन बैंक लि पनवेल बँकेवा प्राधिकृत अधिकारी म्हणून, मला दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तीचा वापर करून कलम १३ (२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ चे नियम ९ नुसार दिनांक. ०९/०१/२०२४ रोजी कर्जदार मोर्गेजर **श्री. प्रियेश पांडुरंग कणगी व सौ. राजश्री प्रियेश कणगी** यांना मागणीच्या नोटीस नुसार स्क्कम रु. ३१,७३,६५४/– (अक्षरी एकतीसलाख त्र्याहत्तरहजार सहाशे चोपन्न रुपये मात्र) अधिक ०१/०१/२०२४ पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च सदर नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसाचे मुदतीत भरण्याबाबत फर्मावले होते.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार यांनी नोटीसीमध्ये मागणी केलेली स्क्कम रु.३१,७३,६५४/–(अक्षरी एकतीसलाख त्र्याहत्तरहजार सहाशे चोपन्न रुपये मात्र) अधिक ०१/०१/२०२४ पासून ठोणारे व्याज अधिक होणारा खर्च दिलेल्या मुदतीमध्ये भरणा केली नसल्याने या नोटीशीने कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर/ गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला कळविण्यात येते कि. खाली सही करणार यांनी दि सिक्युरिटायझेशन अॅड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल ॲसेटस अॅड एनफोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्यये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्ती वापरून विशेषतः सदर कायद्याचे कलम १३ (४) व त्या खालील नियम ९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरून खाली नमूद केलेल्या स्थावर मालमतेचा ताबा दि.०८/०४/२०२४ रोजी घेतला आहे.

कर्जदार मोर्गेजॉर, मोर्गेजॉर/ गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला या नोटीसीद्वारे ताकीद देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणताही व्यवहार करू नये तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार हा दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल यांचे बोज्यासह केला आहे असे समजले जाईल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन व तपशील**

| वर्णन | पत्ता | मालमत्ता गहाण ठेवणाऱ्या मालकाचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| मौजे कामोठे हद्दीतील | गावठाण घर क्र. १२१८ अ,से.३२, कामोठे पनवेल | प्रियेश पांडुरंग कणगी व राजश्री प्रियेश कणगी | ९०० स्क्वेअर फूट |

**स्थळ – पनवेल**
**दि. ०८/०४/२०२४**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि**

## निवडक

### महात्मा फुले जयंतीनिमित्त व्याख्यान



**नवी मुंबई** : राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर लि. प्रणित सम्राट अशोक बुद्ध विहाराच्या प्रांगणात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. नवी मुंबईमधील युवा वक्ता विवेक वारभुवन यांस निमंत्रित केले होते. छत्रपती शिवराय ते विश्वरत्न भिमराय हा पट उलगडून दाखवताना विवेक वारभुवन यांनी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हे उदाहरणांसह स्पष्ट केले. समितीचे वासनिक व खरे यांनी उत्तम नियोजन केले होते, तर खुमासदार शैलीत वाघमारे यांनी निवेदन केले. चेंबूर, माहूल व परिसरातील बहुसंख्य श्रोते कार्यक्रमास उपस्थित होते.

### कळंबोलीतून महिला बेपत्ता



**पनवेल** : घरातून कोणास काही एक न सांगता एक महिला कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. मंगल सोपान पवार (वय ४०, रा. कळंबोली एलआयजी २, से. १) असे या महिलेचे नाव असून तिचा रंग गोरा, उंची ४.५ फूट, केस काळे पांढरे असून तिने जांभळ्या रंगाची साडी नेसली आहे, तसेच तिच्या पायात गुलाबी रंगाची प्लास्टिकची चप्पल आणि हातात हिरव्या रंगाच्या काचेच्या बांगड्या व पितळी बांगड्या असून पायात नकली चेन आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक एस. एस. नवले यांच्याशी संपर्क साधावा.

### मोबाईल खेचून चोरटे पसार

**पनवेल** : दुचाकीवरून येऊन मोबाईल स्नॅचिंग करणाऱ्या दोघा लुटारूंनी खारघर भागात अवघ्या काही मिनिटांमध्ये दोन तरुणांच्या हातातील महागडे मोबाईल फोन खेचून पलायन केल्याची घटना घडली आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील दोघा लुटारूंचा शोध सुरू केला आहे. गैबिसाहब इब्राहिम बालगाव (२३) हा खारघर सेक्टर-१४मधील मशिदीबाहेरील रोडलगत येऊन उभा असता स्कूटीवरून आलेल्या लुटारूंनी त्याच्या हातातील मोबाईल फोन खेचून पलायन केले. त्यांनतर या लुटारूंनी काही अंतरावर असलेल्या स्मशानभूमीजवळ मोबाईलमध्ये यूट्यूबवर शॉर्ट व्हिडीओ बघत उभ्या असलेल्या तौसिब रमजान मुज्ञावर (२४) याच्या हातातील ५० हजार रुपये किमतीचा आयफोन खेचून पळ काढला. या वेळी तौसिब याने लुटारूंना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र ते स्कूटीवरून पसार झाले. त्यानंतर त्याने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# पनवेलमधील नागरिकांसह झाडांनाही मोकळा श्वास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात धूळ नियंत्रणासाठी पालिका प्रशासनाने दोन कोटी ४० लाख रुपये किमतीची दोन अत्याधुनिक वाहने खरेदी केली होती. या वाहनांतून सध्या उन्हाळ्यात रस्त्याजवळील झाडांना पाणी देण्यासोबत हवेतील धूळ नियंत्रण केले जात आहे. रहिवाशांना स्वच्छ हवेसोबत रस्त्यालगतच्या झाडांवर बसलेली धूळही स्वच्छ होत असल्याने झाडांनाही मोकळा श्वास घ्यायला मिळत आहे.

मुंबई महानगर प्रदेशात सर्वाधिक दळणवळण आणि विकसनशील शहरात पनवेल महापालिका क्षेत्र असल्याने पनवेल महापालिका प्रशासनाचे

### धूळ नियंत्रण वाहनांमुळे समाधान




तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांनी तब्बल दोन कोटी ४० लाख रुपये खर्च करून अत्याधुनिक धूळ नियंत्रण करण्यासाठी वाहने खरेदी केली होती.

या वाहनातून पाण्याचे फवारे हवेत वेगाने फेकल्याने त्या परिसरातील ठराविक उंचीवरील धूळ जमिनीवर बसेल. दिवसभरात एक वाहन ८० किमी अंतरापर्यंत रस्त्यालगतच्या परिसरात धूळ नियंत्रण करणार आहे. काही महिन्यांपूर्वी पालिकेने खरेदी केलेली ही वाहने सध्या पालिकेच्या ताफ्यात कार्यान्वित झाली आहेत.

> **नागरिकांना स्वच्छ हवा मिळावी आणि हवेची गुणवत्ता सुधारावी याकरिता पालिकेने धूळ नियंत्रण वाहने खरेदी करण्याचा दूरदृष्टीने निर्णय घेतला. सध्या या वाहनातून धूळ नियंत्रण केले जात आहे.**
> **- डॉ. वैभव विधाते, उपायुक्त, पनवेल मनपा**

विशेष म्हणजे या वाहनातून हवा शुद्धीकरणासाठी वापरले जाणारे पाणी हे महापालिकेच्या उदंचन केंद्रातून शुद्धीकरण केलेले असल्याने हवा शुद्धीकरणासाठी पालिका प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करत असल्याने पिण्याच्या शुद्ध पाण्याचा अपव्यय पालिका टाळत आहे.

या वाहनातील डिझेल इंधनाचा खर्च पालिका करणार आहे. उन्हाळ्यातील चढत्या तापमानाच्या पाऱ्यामुळे या वाहनातून रस्त्यालगत उडणाऱ्या पाण्याचे तुशार हवेतील धूळ नियंत्रण करीत आहेत, मात्र रस्त्यालगतच्या परिसरात थंडावा राहत असल्याने रहिवासी समाधान व्यक्त करीत आहेत.

# एपीएमसीत नो पार्किंगमध्ये ठेकेदाराकडून वसुली

**नवी मुंबई : बातमीदार**

एपीएमसी परिसरात नो पार्किंगच्या ठिकाणी मनपा पार्किंग ठेकेदाराकडून पार्किंगची वसुली चालू केली आहे. विशेष म्हणजे नवी मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयापासून ते मुख्यायातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही याची माहिती असल्याचे बोलले जात आहे.

तुर्भे येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात पाच बाजारपेठांचा समावेश आहे. या ठिकाणी दररोज राज्यातून आणि परराज्यातून हजारो वाहनांची ये-जा असते. त्यामुळे या परिसरात नेहमीच अवजड वाहतुकीची वर्दळ असल्याचे पहावयास मिळते. या बाजार समितीच्या पाचही बाजारपेठांच्या सभोवतालचे काही रस्ते नवी मुंबई महानगरपालिकेने पे अँड पार्कसाठी ठेकेदाराला दिले आहेत. सेक्टर २०हून दक्षिणमुखी हनुमान मंदिराकडे येणाऱ्या मार्गावर (बीएआरसी) भाभा अणुसंशोधन केंद्राचा एक प्रकल्प आहे. या प्रकल्पासमोरील रस्त्याला राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणास्तव नो पार्किंग क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. असे असतानाही या ठिकाणी फळ मार्केटमधील गाड्या पार्किंग करून ठेवलेल्या असतात. या ठिकाणी महानगरपालिकेच्या पे अँड पार्किंग ठेकेदाराकडून पार्किंगच्या शुल्काची वसुली केली जात आहे. त्याचप्रमाणे एपीएमसी परिसरातील अन्य काही ठिकाणीदेखील या ठेकेदाराला पार्किंगचे शुल्क वसुली करण्याची परवानगी नसताना (ज्या ठिकाणी नो पार्किंगचे बोर्ड आहे) त्या ठिकाणीही बेकायदेशीरपणे पार्किंगची वसुली केली जात आहे, असे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

एपीएमसीच्या पाचही मार्केटमध्ये येणाऱ्या गाड्या हंगामाच्या वेळी त्वरित बाजार आवारामध्ये घेतल्या जात नाहीत. त्यामुळे या गाड्यांना बाहेरील सर्व्हिस रस्त्यावर तसेच महापालिकेच्या रस्त्यावर प्रतीक्षा करावी लागते. सध्या कलिंगड आणि आंब्याचा हंगाम चालू आहे. त्यामुळे फळमार्केट परिसरात मोठ्या प्रमाणात आंबा, कलिंगड आणि अन्य फळ घेऊन येणाऱ्या गाड्यांची मोठ्या प्रमाणावर आवक होत आहे. परिणामी एपीएमसी सिग्नल ते दक्षिणमुखी हनुमान चौक, दक्षिणमुखी हनुमान चौक ते सीडब्ल्यूसी गोडाऊन सेक्टर २०, सीडब्ल्यूसी गोडाऊन ते माथाडी भवन चौक आणि माथाडी भवन चौक ते एपीएमसी वाहतूक चौक सिग्नल हा परिसर नेहमीच वर्दळीचा असतो. ही अवजड वाहने पार्क करण्याकरिता फळ मार्केट आणि भाजी मार्केटच्या पूर्वेकडून तसेच वाशी तुर्भे लिंक रोडलगत सर्व्हिस रोड आहे, मात्र या रस्त्यावर अन्य वाहनांची पार्किंग होत असल्याने मार्केटमध्ये शेतमाल घेऊन येणाऱ्या वाहनांना वाशी तुर्भे लिंक रोडवर गाड्या उभ्या कराव्या लागतात. त्यामुळे अगोदरच हा रस्ता केवळ दोन मार्गीकेचा असल्याने आंब्याच्या हंगामात तीन महिने या परिसरात वाहतूक कोंडी झाल्याचे पहावयास मिळते.

ही वाहतूकोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलीस दिवस-रात्र परिश्रम घेताना दिसतात.

# नवी मुंबई पोलीस गडचिरोलीत ‘ऑन ड्युटी’

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात गडचिरोली येथे मतदान होत आहे. या नक्षली आणि दुर्गम भागामध्ये मतदानप्रक्रिया निर्भय वातावरणात पार पाडावी, यासाठी नवी मुंबई पोलीस दलातील ३०० अंमलदारांसह १० अधिकारी जाणार आहेत.

देशामध्ये लोकसभेची सात टप्प्यांमध्ये निवडणूक होत आहे. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील काही मतदारसंघांमध्ये मतदान होत आहे. त्यामध्ये गडचिरोली, चिमूरचा समावेश आहे. अतिदुर्गम अशा या मतदारसंघात मतदान केंद्रे दूर आहेत, तसेच बराचसा भाग हा नक्षलग्रस्त असल्याने निर्भय वातावरणामध्ये निवडणुका घेणे आव्हानात्मक असते. त्यामुळे स्थानिक पोलिसांबरोबरच बंदोबस्तासाठी बाहेरची कुमक मागवली गेली. नवी मुंबई पोलीस मुख्यालयातून १०० जणांच्या तीन तुकड्या जाणार आहेत.

यातील पहिली तुकडी गुरुवारी (दि. ११) गडचिरोलीकडे रवाना झाली असून मुख्यालय, वाहतूक, गुन्हे आणि स्थानिक पोलीस ठाण्यातील अंमलदारांचा समावेश आहे.

# व्हीस्टा प्रोसेस फूड कंपनीकडून गरजवंत कुटुंबियांना सार्वजनिक शौचालय




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील व्हीस्टा प्रोसेसफूड या कंपनीच्या सीएसआर फंडाच्या मदतीतून गरजवंत कुटुंबियांना सार्वजनिक शौचालय बांधून देण्यात आले आहेत.

गाडगीळ गुरुजी सामाजिक व शैक्षणिक संस्था गुळसुंदे यांच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. ज्यामध्ये मेडिकल कॅम्प, अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना शैक्षणिक व वैद्यकीय मदत, शस्त्रक्रिये साठी मदत, निराधार महिलांच्या लेकींच्या विवाहासाठी मदत आदी उपक्रम दरवर्षी राबवले जातात. या वर्षी व्हीस्टा प्रोसेसफूड या कंपनीच्या सीएसआर फंडाच्या मदतीतून आदिवासी कुटुंबांसाठी सार्वजनिक शौचालय बांधून देण्यात आले, ज्यामध्ये तीन कुटुंब मिळून एक शौचालय अशी कल्पना साकारण्यात आली.

या उपक्रमात कंपनीचे एम. डी. भुपेंदर सिंग, व्यवस्थापन सल्लागार चंद्रशेखर सोमण यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. प्लँट मॅनेजर प्रवीण ठाकूर, प्रोडक्शन मॅनेजर नीलेश म्हात्रे, एचआर ऑफिसर प्रणीत खुटले व इंद्रायणी यांनी उपक्रमात सहभाग घेतला.

याबद्दल गाडगीळ गुरुजी सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मीनेश गाडगीळ यांनी आभार मानले आहेत.

### कोंडले येथे श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कोंडले येथे १४ ते १७ ते एप्रिलदरम्यान श्रीराम मंदिर उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी आरती, अभिषेक, भजन, पालखी, काकड कीर्तन, होम हवन व अग्री स्थापना, पुण्यवाचक हरिपाठ, भजन होईल. श्री रामनवमीच्या दिवशी कीर्तनकार बेलनाथ महाराज गुरुश्री योगी संपतनाथ पंथ आई गोरक्षनाथ यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रवींद्र पाटील यांनी केले आहे. ग्रामस्थ मंडळ, मरीआई क्रिकेट संघ, गावदेवी महिला मंडळ, बजरंग दल मोर्बे, ग्रामस्थ मंडळ खैरवाडी व मोर्बे यांनी नियोजन केले आहे.

# कळंबुसरे येथे स्वयंभू श्री इंद्रायणी एकविरा देवीची यात्रा, पालखी सोहळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील कळंबुसरे येथील स्वयंभू श्री इंद्रायणी एकविरा देवी यात्रा व पालखी सोहळा १५ ते १६ एप्रिलदरम्यान श्री इंद्रायणी एकविरा माता ट्रस्ट, कळंबुसरे ग्रामस्थ, मित्र मंडळाकडून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येत आहे.

कळंबूसरे येथील स्वयंभू इंद्रायणी एकविरा हे पांडवकालीन स्वयंभू स्थान आहे. प्राचीन काळी पांडव वनवास करीत असताना या इंद्रायणी कळंबुसरे डोंगरावर वास्तव्यास होते, तसेच कार्ल्याची एकविरा देवी पण या ठिकाणी वास्तव्यास होती. ‘एका दिवसात माझे देऊळ या ठिकाणी बांधा, मी येथे वास्तव्यास राहिन’, असा आदेश एकविरा देवीने पांडवांना दिला, पण एका दिवसात या ठिकाणी देऊळ बांधता आले नाही.



देवीने देऊळ व इतर परिसर उद्ध्वस्त केले. देवळाचे काही अवशेष या ठिकाणी पहायला मिळतात. यानंतर देवी कार्ला येथे स्थायिक झाली. देवीचे आजही येथे वास्तव्य आहे, तसेच देवी नवसाला पावणारी, मनातील ईच्छा पूर्ण करणारी म्हणून प्रचलित आहे.

येथे चैत्र उत्सव व नवरात्र उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो, तसेच पावसाळ्यात या ठिकाणी निसर्गरम्य वातावरण आपणास पहायला मिळते. वर्षासहलीसाठी हे ठिकाण खूप चांगले आहे. इंद्रायणी एकविरा देवी मंदिर कळंबुसरे या ठिकाणी आवर्जून भेट द्यावी, असे हे निसर्गरम्य ठिकाण आहे. इंद्रायणी एकविरा माता ट्रस्ट कळंबुसरे उरण यांच्यामार्फत व ग्रामस्थांमार्फत येथे विविध सण उत्सव साजरे केले जातात.

रविवारी (दि.१४) इंद्रायणी एकविरा देवी यात्रा आरंभ, सोमवारी (दि.१५) पालखी व मंगळवारी (दि.१६) देवीचा वैद्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सर्व एकविरा भक्तांनी दर्शनाचा व पालखी सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन इंद्रायणी एकविरा माता ट्रस्ट कळंबुसरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# उरणमध्ये १२०० अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिर



**उरण : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील १९० उरण विधानसभा मतदारसंघात कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी मतदान प्रशिक्षण शिबिराचे शनिवारी (दि.१३) आयोजन करण्यात आले होते.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी दिपक सिंघला यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिराप्रसंगी १२०० मतदान अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. मावळ लोकसभेची निवडणूक १३ मे रोजी जाहीर झाली आहे.

यामुळे सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश असलेल्या या लोकसभा मतदारसंघात मतदारसंघात निवडणुकीची जोरदार तयारी सुरू आहे. या लोकसभा मतदारसंघात १९० उरण हा विधानसभा मतदारसंघाचाही समावेश आहे. या उरण विधानसभा मतदारसंघात एकूण ३४४ मतदान केंद्र आहेत. या ३४४ मतदान केंद्रात १२०० अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आलेल्या आहेत. या नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मतदान प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

तालुक्यातील जासई येथील दिवंगत दि. बा. पाटील सभागृहात मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी दिपक सिंघला यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या मतदान प्रशिक्षण शिबिरात सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी जनार्दन कासार, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम, पनवेलचे अप्पर तहसिलदार जितेंद्र इंगोले, अर्चना प्रधान आदी अधिकारी उपस्थित होते.

या मतदान प्रशिक्षण शिबिरात उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक अधिकारी दिपक सिंघला यांनी मार्गदर्शन केले .या मार्गदर्शनात त्यांनी मतदान प्रक्रियेत कोणती काळजी घ्यावी, कशा पद्धतीने हाताळणी करावी याची सविस्तर माहिती कर्मचारी व अधिकाऱ्यांना करून दिली, तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचेही त्यांनी निराकरण केले.

### शिवकालीन युद्धकलेचे कामोठ्यात जतन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून त्याचा विस्तार केला. मराठ्यांनी, मावळ्यांनी अटकेपार झेंडे लावत पराक्रमाचा इतिहास घडवला. शिवकालीन युद्धकलेचा त्यांनी अवलंब केला. त्याची जाणीव आणि माहिती नवीन पिढीला व्हावी या उद्देशाने कामोठे हिंदू नववर्ष स्वागत समिती काम करीत आहे. यासाठी महिलांना प्रशिक्षण देऊन या कलेचे धडे दिले जात आहेत. याचे दर्शन गुढीपाडव्यानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेमध्ये घडले. स्त्रियांनी तलवारबाजी, लाठी-काठी, दांडपट्टा या मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक दाखवून स्त्री-शक्तीची ताकद दाखवून दिली. असे उपक्रम वर्षभर राबविण्यात येतात.

यासाठी मनीषा नीलकंठ आणि जयश्री झा-सुद्रिक पुढाकार घेतात. या कलेमध्ये त्या पारंगत असून कामोठे येथील जास्तीत जास्त महिलांना ही कला कशी अवगत होईल त्या दृष्टिकोनातून या दोघींचा प्रयत्न असतो.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे जयंतीनिमित्त वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आत्मकथा पुस्तकांचे वितरण : एक शिक्षणात्मक कार्यक्रम मनविसेने वाशी येथे राबवला. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्त्व तमाम भारतीयांना पटवून दिले आहे. हाच धागा पकडून आंबेडकर यांची जयंती शैक्षणिक उपक्रमाने साजरी व्हावी यासाठी मनविसेने ठरवून त्यानुसार पुस्तक प्रदान करण्याचा निर्णय घेतला.

### मनविसेचे विशाल भणगे यांचा स्तुत्य उपक्रम

त्यानुसार महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि.१२) वाशी विभागातील सर्व शाळा व महाविद्यालयात जाऊन त्यांना प्रत्यक्ष भेट देऊन विविध समस्यांवर चर्चा केली. सर्व शाळा आणि महाविद्यालय यांच्या प्राचार्य व शिक्षकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ‘माझी आत्मकथा’ हे पुस्तक भेट देऊन त्यांचे एक प्रेरणावाक्य ‘वाचा, शिका, संघटित व्हा’ असा संदेश दिला. या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या प्रसंगी विक्रांत मालुसरे सहसचिव महाराष्ट्र राज्य व्यापारी सेना, विशाल भणगे सहसचिव नवी मुंबई मनविसे, शुभम भोईर विभाग अध्यक्ष वाशी मनविसे, अभिजीत आगरे उपविभाग अध्यक्ष वाशी मनविसे, अनिरुद्ध मेंगडे विभाग सचिव वाशी मनविसे, शेखर राव, जयपाल पवार व इतर मनसैनिक उपस्थित होते.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यांचा सन्मान करणारा भारतीय जनता पक्ष

या भारत देशातील बौद्ध, नवबौद्ध, चर्मकार, रूबी वा वाल्मिकी तसेच मातंग समाज अशा अनुसूचित जातींचा आणि दुसरीकडे कातकरी, ठाकूर, भिल्ल अशांमध्ये साळी, माळी, तेली, कोळी अशा अठरा पगड जातीतील समाजाच्या मनामध्ये तसेच भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या लोकांच्या मनावर राजकीय पक्षांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच डाव्या विचारसरणीच्या पक्षांनी तसेच समाजातील बुद्धिवतांनी सतत हे बिंबवण्याचा प्रयत्न केला की भारतीय जनता पक्ष हा जातीयवादी पक्ष आहे, कट्टर हिंदुत्ववादी पक्ष असून त्यांच्यासोबत आपण कधीच गेलो नाही पाहिजे. भारतीय जनता पक्षाच्यासोबत विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या दोन हिंदुत्ववादी कट्टर संस्था असून ते हिंदुत्वाचा पुरस्कार करतात आणि ते मागासवर्गीय समाजाचा तिरस्कार करतात, असाही चुकीचा व अप्प्रचार केला जातो. भारतीय जनता पक्ष जर सत्तेवर आला तर मागासवर्गीय समाजाचे नोकरीतील आरक्षण, शिक्षणातील आरक्षण हे काढून घेतले जाईल, शिष्यवृत्ती बंद केली जाईल, शिक्षणांसाठी असलेल्या मुलांचे शासकीय वसतिगृह बंद करतील, राजकारणातील आरक्षण बंद करतील आणि तुम्हाला पुन्हा अन्याय-अत्याचाराला सामोरे जावे लागेल. जातीय दंगली घडतील, स्त्रियांवरील अत्याचार वाढतील, मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाईल, आपले प्रशासनातील मोठे अधिकारी होऊ शकणार नाहीत असे प्रस्थापित पक्ष सांगत गेले. जोपर्यंत एखादा वक्ता किंवा ज्याला विचारवंत समजले जाते तो त्याच्या भाषणामध्ये भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषद आणि हिंदुत्वाविरोधी बोलत नाही तोपर्यंत त्याच्या भाषणाला टाळ्या मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे अशी अतिउत्साही मंडळी केवळ टाळ्या घेण्यासाठी का होईना, पण भाजपच्या विरुद्ध बोलल्याशिवाय आणि आम्हीच तुमचे रक्षणकर्ते आहोत, तुमच्याच बाजूचे आहोत हे सांगितल्याशिवाय त्यांचे भाषण पूर्ण होत नाही.

वास्तविक, या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जे-जे पक्ष आजपर्यंत केंद्रात किंवा राज्यात सत्तेवर आले त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कधी सन्मान केलेला नाही जो भारतीय जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मागासवर्गीय समाजाचा सन्मान केलेला आहे. मला सांगायला या ठिकाणी अभिमान वाटतो की, भारतीय जनता पक्षाची केंद्रात एकहाती सत्ता आल्यानंतर या देशाचा राष्ट्रपती कट्टर हिंदुत्ववादी व्यक्तिला केले जाईल. मग तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा तरी असेल, नाही तर विश्व हिंदू परिषदेचा प्रमुख असेल असे मागासवर्गीय समाजाच्या मनामध्ये ठसवण्याचा प्रयत्न झाला, पण असे काही घडले नाही. भारतीय जनता पक्षाने मागासवर्गीय समाजाचा सन्मान करण्यासाठी एका अर्थाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला अभिवादन करण्यासाठी या देशातील अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रपती पदावर एका अनुसूचित जातीचा व्यक्ती अर्थात मागासवर्गीय समाजाचे रामनाथ कोविंद यांना सन्मानाने विराजमान केले. त्यानंतर आता आदिवासी समाजाच्या द्रौपदी मुर्मू यांना राष्ट्रपती करण्यात आले आहे. अशा पद्धतीचा मान-सन्मान काँग्रेस असेल, कम्युनिस्ट असतील कोणत्याही पक्षाने केला नाही, परंतु हे जे शक्य झाले ते भाजपच्या, मोदी सरकारच्या कार्यकाळात झाले. अशा प्रकारे मागासवर्गीय, अनुसूचित जाती-जमातीच्या व्यक्तींना मोठी संधी देऊन त्यांचा अनोखा गौरव पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपने केला आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या दिवशी शाळेत गेले तो ७ नोव्हेंबर १९०० हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून आज संपूर्ण देशात साजरा होतो आहे. हेही बाबासाहेबांना आगळ्यावेगळ्या पद्धतीने केलेले एक विनम्र अभिवादनच म्हणावे लागेल. या देशामध्ये अनेक सरकारे आली आणि गेलीसुद्धा. ज्या वेळेला बाबासाहेबांची जन्मशताब्दी (१०० वर्षे पूर्ण) झाली, त्या वेळेला बाबासाहेबांचा सन्मान करणे आवश्यक होते, मात्र ते झाले नाही, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्म शतकोत्तर १२५ वर्षे पूर्ण झाली त्या वेळी केंद्रात भारतीय जनता पक्षाचे मोदी सरकार अस्तित्वात होते. भाजपच्या कारकिर्दीत मोदी सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १२५ वर्षे पूर्ण झाली त्या वेळेला संपूर्ण देशभरात डॉ. आंबेडकरांच्या नावाने सामाजिक समता रथ हा संपूर्ण देशभरातील प्रत्येक तालुक्यात नेऊन बाबासाहेबांच्या नावाचा उदो उदो केला आणि त्यांची महती जनतेला नाक्या-नाक्यावर सांगितली. हा फार मोठा केंद्र सरकारने केलेला सन्मान आहे हे प्रकर्षाने जनतेने स्वीकारलेले आहे. मागासवर्गीय समाजाला यामुळे मोदी सरकारचा अभिमान वाटायला लागला.

२६ नोव्हेंबर हा संविधान दिवस. २६ नोव्हेंबर १९४९ याच दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला भारतीय संविधान प्रदान केले, पण हा दिवसदेखील दुर्लक्षित होता. केंद्रामध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर त्यांनी २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून जाहीर केला. प्रत्येक शाळेमध्ये, शासकीय कार्यालयामध्ये, निमशासकीय कार्यालयांमध्ये २६ नोव्हेंबर हा संविधान दिन साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आणि देशभरात आज भारतीय जनता पक्षाच्या कारकिर्दीमध्ये २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून पाळला जात आहे याचादेखील अभिमान मागासवर्गीय समाजाला आणि देशाला आज वाटत आहे. २९ सप्टेंबर २०१७ रोजी मोदी सरकारच्या कारकिर्दीत बौद्ध, नवबौद्ध समाजाला अल्पसंख्याक समाजामध्ये समाविष्ट करण्यासाठी राष्ट्रपती महोदयांच्या सहीचा एक अद्यादेश काढण्यात आला आणि तो लोकसभेमध्ये एकमताने मंजूर करण्यात आला हा बौद्ध व नवबौद्ध समाजाचा सन्मानच म्हणावा लागेल. भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याशी संबंधित असलेल्या भारत देशातील पाच ठिकाणी पंचभूमी म्हणून मोदी सरकारने जाहीर करून या सर्व ठिकाणी आदरांजली अर्पण करण्याची स्तुत्य पद्धत सुरू केली. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांचा सन्मान वाढलेला आहे आणि बहुजन समाज आनंदित झालेला आहे. ती ठिकाणे अशी १. महू-जन्मभूमी, २. लंडनचे घर-शिक्षणभूमी, ३. नागपूर-दीक्षाभूमी, ४. दिल्ली-महापरिनिर्वाणभूमी, ५. दादर- चैत्यभूमी. ही पाच पवित्र ठिकाणे पंचभूमी म्हणून मोदी सरकारमधील सामाजिक न्याय व सक्षमीकरणमंत्री थावरचंद गेहलोत यांनी आणि सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत घोषित केली तसेच दिल्ली येथील १५ जनपथ मार्गावर १९५ कोटी रुपये खर्च करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय अध्ययन केंद्र तयार करण्याचे काम केले.

या देशाला भ्रष्टाचाराची कीड लागली होती ती साफ करण्याचे काम भारतीय जनता पक्षाच्या कारकिर्दीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'न खाऊंगा, ना खाने दुंगा!' या ब्रिदवाक्यानुसार प्रामाणिकपणे केले. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी 'भीम ॲप' ही योजना सुरू केली. म्हणजेच भीम आधार योजनेचा शुभारंभ १४ एप्रिल २०१७ रोजी करण्यात आला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुन्हा सन्मान करण्याचे काम भारतीय जनता पक्षाच्या कारकिर्दीमध्ये मोदीसाहेबांनी केले याचा आम्हाला गर्व आहे. प्रत्येक दुकानात खरेदी-विक्री करताना त्या ठिकाणी जो स्कॅनर ठेवला आहे त्याच्या माध्यमातून ते पेमेंट केले जाते, तर त्या ठिकाणी तो व्यवहार मोबाइलच्या माध्यमातून कोणाच्या खिशात पैसे नसले तरी बँकेच्या खात्यातून भीम ॲपच्या मदतीने होतो. अशा प्रकारे कोणतीही वस्तू खरेदी करण्याची योजना भारतीय जनता पक्षाच्या मोदीसाहेबांनी भीम ॲपद्वारे आणली. याशिवाय कौशल्य विकास प्रशिक्षण योजना अंतर्गत अनुसूचित जातीच्या लोकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर इंदू मिलवर जागतिक दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी अनेक वर्षे प्रयत्न झाले. अनेक सरकारे आली आणि गेली, मात्र त्यांना इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बांधता आले नाही व जागादेखील ताब्यात घेता आली नाही, परंतु केंद्रात भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यानंतर मोदी सरकारच्या काळात इंदू मिलची जागा ताब्यात घेण्यात आली व त्या जागेवर हजारो कोटी रुपये खर्च करून आंतरराष्ट्रीय दर्जाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक तयार होताना दिसून येत आहे. याचा सार्थ अभिमान बौद्ध, दलित समाज व मागासवर्गीय समाजाला आहे. हे सारे करण्याचे धाडस ज्यांनी केले तो पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष आहे. अशा प्रकारे कोणीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान वाढविण्यासाठी कार्य केले नाही, कोणता पक्ष पुढे आला नाही. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणाले होते, 'काँग्रेस हे जळते घर आहे.' डॉ. आंबेडकरांना घटना लिहिण्यासाठीदेखील विरोध केला गेला होता. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या नावाने सातत्याने धंदा करणाऱ्या लोकांना आज मला सांगायचे आहे की, डॉ. आंबेडकरांचा सन्मान जर आज कोणता राजकीय पक्ष करीत असेल तर तो भारतीय जनता पक्षच आहे याची मला खात्री झाली आहे. म्हणून मला समाजातील जे बौद्ध, अनुसूचित जातीत मोडणारे आहेत, अनुसूचित जमातीत मोडणारे, मागासवर्गीय समाज आहे त्यांना मला सांगायचे आहे की, जी लोकं सातत्याने तुमच्या मनावर हे बिंबवत होते की, भारतीय जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर तुमच्यावर अन्याय होईल, अत्याचार होईल, तुमच्या राखीव जागांचा अधिकार काढून घेतला जाईल, नोकरीमध्ये असलेले आरक्षण काढून घेतले जाईल, पण प्रत्यक्षात असे काहीही झाले नाही.

भारतीय जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर ज्या वेळी नरेंद्र मोदी जे या भारत देशाचे प्रधानमंत्री झाले त्या वेळी त्यांनी संपूर्ण जगाला हे सांगितले की, 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे एक चहा विकणारा व्यक्ती या देशाचा प्रधानमंत्री झाला, याचे सारे श्रेय केवळ फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जाते.' असे जाहीरपणे सांगणारे या देशाचे एकमेव प्रधानमंत्री म्हणजे नरेंद्र मोदी. त्या वेळी त्यांना जात-पात आठवली नाही. त्यांना फक्त देशहित आठवले, त्यांना आठवले फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांना आठवली या देशाची समता, स्वातंत्र्य, बंधूत्व आणि न्याय, या देशातील सर्वधर्मसमभावाने राहणारी या देशाची लोक जनता आणि या देशाचे संविधान. मला सांगायला आनंद वाटतो की, जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ गाव आंबवडे आहे व त्यांच्या पत्नी माता रमाई याचे जन्मगाव वनंद आहे. या ठिकाणी या देशाचे राष्ट्रपती कधीच गेले नव्हते, पण भारतीय जनता पक्षाच्या कारकिर्दीमध्ये १२ फेब्रुवारी २०२२ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूळ गावाला राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी प्रत्यक्ष भेट दिली आणि या गावाचा विकास त्या ठिकाणी झाला. मग याला भारतीय जनता पक्षाच्या कारकिर्दीला जातीयवादी राजवट असे म्हणता येईल का? भारतीय जनता पक्ष हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी प्रतारणा करणारा पक्ष आहे असे म्हणता येईल का? भारतीय जनता पक्ष हा मागासवर्गीय समाजाच्या विरोधात आहे असे म्हणता येईल का? भारतीय जनता पक्ष हा डॉ. आंबेडकरांनी लिहिलेली भारत देशाची राज्यघटना बदलतील असे म्हणता येईल का? याचे उत्तर नाही! नाही!! आणि नाही!!! असेच आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान या देशामध्ये सर्वांत जास्त प्रमाणात झाला असेल तर तो भारतीय जनता पक्षाच्या कारकिर्दीतच झालेला आहे हे आवर्जून मला येथे सांगायचे आहे. हे आम्ही ज्या वेळेला तालुक्यात, जिल्ह्यात फिरतो तेव्हा या गोष्टी लोकांच्या समोर मांडल्यानंतर लोकांना खरोखर मग ते अनुसूचित जातीचे, अनुसूचित जमातीचे, मागासवर्गीय समाजाचे असतील यांना मोदी सरकारच्या कारकिर्दीत काय काय केलं हे सांगितल्यानंतर त्यांना भारतीय जनता पक्ष हा आपुलकीचा पक्ष वाटतो. या देशात मागासवर्गीय समाजाचा सन्मान जर कोणी करणार असेल तर तो भारतीय जनता पक्षच करू शकतो अशी आता खात्री सर्वजणांची व्हायला लागली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान करणारा देशातील एकमेव पक्ष म्हणून भारतीय जनता पक्ष आहे अशी माझी आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांची तर पूर्णपणे खात्री झाली आहे.

जय भीम! जय भारत!! जय संविधान!!!

**-ॲड. प्रकाश बिनेदार,**
**भाजप जिल्हा सरचिटणीस तथा**
**माजी नगरसेवक, पनवेल महानगरपालिका**

# मानवता रुजविणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर





माणूस जन्माला येतो तेव्हा तो एक पवित्र जीव असतो. त्या पवित्र जीवावर लहान वयात सर्वच प्रेम करतात. जेव्हा सर्व जाती-धर्मांचे त्या पवित्र लहान जीवाचे लाड पुरवतात तेव्हा त्या जीवाला हे संपूर्ण विश्व किती चांगले आहे आणि किती चांगले लोक आहेत हे वाटू लागतं, पण तो जसाजसा मोठा होतो तसतसे त्यावर समाजाचे संस्कार होत असतात. त्याला लहानपणीचा व मोठे होण्याचा अनुभव हा वेगळा जाणवत असतो. अशाच या मानवाच्या जीवनचक्रातून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जन्मापासूनच जातीय व्यवस्थेचे चटके सोसावे लागले. वर्गाच्या बाहेर शिक्षण घ्यावे लागले. काय वाटले असेल त्या कोमल जीवाला. एकाला एक न्याय दुसऱ्याला वेगळा न्याय, परंतु शिकवण ही झाली होती की सर्व लेकरं देवासमान. सर्व लेकरं देवाघरची फुलं. मग या देवाघरच्या सर्व समान लेकरांना हा वेग वेगळा न्याय का? किती द्वंद्व चालले असेल या लहानशा बाबासाहेबांच्या मनामध्ये.

आपण संपूर्ण डॉ. बाबासाहेबांचे जीवन बघितले तर त्यांनी खूप हाल व अपमान सहन केले. एवढी विद्वत्ता असूनसुद्धा का अपमान सहन करायचा? या विचाराने किती त्यांना त्रास झाला असेल. या समाजातील इतकी विदारकता बघून किती त्यांना त्रास झाला असेल, परंतु हा बदल झाला पाहिजे. माणूस म्हणून माणसाला माणूसपण मिळाले पाहिजे हा विचार त्यांनी केला आणि हा समाज जरी माझ्यासोबत वाईट वागला तरी मी या समाजाचे कल्याण करेन याला अनुसरून त्यांनी द्वेषाचे उत्तर प्रेमाने दिले. किती मोठे तत्त्वज्ञान. तुम्ही आम्हाला कुचला, तरी आम्ही उभारी घेऊ, किती मोठी जिद्द, किती मोठा आत्मविश्वास. अनुकूल परिस्थिती असताना प्रगती करणे वेगळे, पण प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून समाजासाठी जीवन जगणे वेगळे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाशिवाय काही दुसरा प्रगतीचा मार्ग नाही हे ओळखले होते. म्हणून त्यांनी अहोरात्र अभ्यास केला. एकदा तर इंग्लंडच्या ग्रंथालयात ते अभ्यास करीत असताना ग्रंथपाल एक दिवस त्यांना ग्रंथालय बंद करताना सांगायचे विसरून गेला. दुसऱ्या दिवशी जेव्हा ग्रंथालय उघडले तर आश्चर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचण्यात मग्न होते. ते जेव्हा पुस्तक वाचत तेव्हा दिवस-रात्र विसरून जात. ही अभ्यासाविषयीची गोडी सर्व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरणारी आहे.

डॉ. बाबासाहेब हे खऱ्या अर्थाने मानवतावादी होते. सर्व कामगारांना योग्य न्याय मिळाला पाहिजे म्हणून कामाचे तास ठरवून देणे, सर्वांना बोनस मिळावा यासाठी कायद्यात तरतूद, पीएफ-ग्रॅच्युइटीचा अधिकार प्राप्त करून दिला. सर्व कामगारांना यामुळे न्याय मिळाला व त्यांचे जीवन सुरळीतपणे पार पडत आहे. स्त्रियांना भरपगारी प्रसूती रजा मिळवून दिली. याचा अगोदर कोणी विचारसुद्धा केला नाही.

शेतकरी जो देशाचा कणा असतो. कृषी उत्पन्नावर त्या देशाची प्रगती ठरत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांना त्यांचा न्याय हक्क मिळावा म्हणून आंदोलन केले. शेतकऱ्यांचा संप करणारे ते पहिले पुढारी ठरले. शेतकरी हे सर्व धर्मांचे व जातीचे असतात यांच्या सर्वांच्या न्याय हक्कासाठी ते लढले.

या जगामध्ये सर्वात जास्त संघर्ष व जीवितहानी झाली असेल तर ती म्हणजे धर्माच्या नावावर. जगामध्ये लाखो जणांचे प्राण धर्मासाठी गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व धर्मांचा अभ्यास केला. एवढेच नाही; तर त्यांना सगळ्याच धर्मांचे निमंत्रणसुद्धा होते, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शांतीचा मार्ग देणारा मूळ भारतीय बौद्ध धर्म स्वीकारला, ज्यामध्ये भगवान बुद्धांनी वैज्ञानिक दृष्टिकोन मार्गाचा उपदेशसुद्धा दिलेला आहे. धर्म परिवर्तन म्हणजे सोपे नाही. ते ही त्या काळी ज्या वेळी सगळे समाज बांधव हे जास्त प्रमाणात सुशिक्षित नव्हते. त्यांना योग्य दिशा देणे, धर्म परिवर्तन हे काही सोपे काम नव्हते. धर्मासाठी रक्ताचे पाट वाहिले आहेत. किती जणांना विश्वात आहुती मिळाली आहे. गुदमरून चेंबरमध्ये त्यांना प्राण द्यावे लागले, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रक्ताचा एक थेंब ही ना सांडवता एवढे मोठे धर्म परिवर्तन केले. कुठल्याही प्रकारची जीवितहानी होऊ दिली नाही.

सर्वांत मोठे उपकार डॉ. बाबासाहेबांचे आपल्या भारतीयांवर आहे ते म्हणजे त्यांनी लिहिलेल्या राज्य घटनेमध्ये सर्वांना समान अधिकार देण्यात आला आहे. खरी लोकशाही जिवंत ठेवण्याचे व रूजविण्याचे काम संविधानाने केले आहे. यात अभियक्ती स्वातंत्र आहे. आपण आपले म्हणणे, विचार व्यक्त करू शकतो. आपल्या न्याय्य-हक्कांसाठी झगडू शकतो. हे अभियक्ती स्वातंत्र व न्याय्य-हक्क सर्व भारतीयांसाठी आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तेव्हा नद्या जोडण्याचा ठराव मांडला होता. उद्देश हाच होता की सर्वांना व शेतीला मुबलक पाणी मिळावे. आज पाण्याची कमतरता काही भागामध्ये आपल्या देशात भासू लागली. हा विचार त्यांनी त्या काळी केला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानव हा संपूर्ण विश्वाचा केंद्रबिंदू आहे हे समजले होते. मानवाचा विकास होणे, त्याला संपूर्ण संधी देणे, न्याय देणे हा मूलमंत्र दिला. आपापसातील वैर संपविणे व गुण्यागोविंदाने सर्व देशवासीयांनी राहणे हा मूलमंत्र संविधानाने दिला. मानव कल्याणासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचा विचार सर्वांपर्यंत पोहचवू या विचारधारेने त्यांची जयंती साजरी करूया. डॉ. आंबेडकर जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा. जय भीम! जय भारत!

**- अरविंद मोरे, नवीन पनवेल**

# दिल्लीची लखनऊवर मात

## पदार्पणवीर जेक फ्रेझर मॅकगर्कचे शानदार अर्धशतक



**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुक्रवारी लखनऊ सुपरजायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने होते. यामध्ये दिल्लीने लखनऊवर सहा विकेट्सनी विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना लखनऊने आयुष बडोनीच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर दिल्लीसमोर १६८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात दिल्लीने पदार्पणवीर जेक फ्रेझर मॅकगर्कच्या अर्धशतकाच्या जोरावर चार गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केले.

१६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीची सुरुवात चांगली झाली नाही, कारण डेव्हिड वॉर्नर केवळ आठ धावा करून बाद झाला. त्याच्यानंतर पृथ्वी शॉने जबाबदारी स्वीकारली, पण मागील सामन्याप्रमाणे त्याला अर्धशतक झळकावता आले नाही. तो २२ चेंडूंत ३२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. दिल्लीने पूर्वार्धात अतिशय संथ फलंदाजी केली, मात्र त्यानंतर ऋषभ पंत आणि नवोदित जेक फ्रेझर मॅकगर्क यांनी तुफानी शैलीत फलंदाजी केली. एकीकडे पंतने २४ चेंडूंत ४१ धावांची खेळी खेळली, ज्यात त्याने चार चौकार आणि दोन षटकार मारले, तर मॅकगर्कने ३५ चेंडूंत ५५ धावा केल्या. त्याने दोन चौकार आणि पाच षटकार मारले.

दिल्ली कॅपिटल्सची पहिल्या १० षटकांत धावसंख्या २ बाद ७५ धावा होती, पण येथून डीसीच्या फलंदाजांनी वेग पकडण्यास सुरुवात केली. ऋषभ पंत आणि मॅकगर्क यांनी पुढच्या २४ चेंडूंत ६१ धावा केल्या आणि चार षटकांच्या या कालावधीत दोघांनी मिळून पाच गगनचुंबी षटकार आणि चार चौकार लगावले, पण पंधराव्या षटकात मॅकगर्क आणि पुढच्याच षटकात ऋषभ पंत बाद झाल्याने सामना अडकलेला दिसत होता. पंत आणि मॅकगर्क यांच्यात ७७ धावांची भागीदारी झाली. दिल्लीला दोन षटकांत फक्त १० धावा हव्या होत्या. त्या वेळी शाई होप आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी घाई न करता ११ चेंडू शिल्लक असताना दिल्लीचा सहा गडी राखून विजय मिळवून दिला. लखनऊकडून रवी बिश्नोईने दोन, तर नवीन-उल-हक आणि यश ठाकूर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

लखनऊ आणि दिल्ली यांच्यातील या सामन्यात युवा खेळाडूंनी वर्चस्व गाजवले. तत्पूर्वी लखनऊने अवघ्या ७४ धावांत सात विकेट्स गमावल्या होत्या, मात्र त्यानंतर आयुष बडोनीने ३५ चेंडूंत ५५ धावा केल्या आणि अर्शद खाननेही १६ चेंडूंत २० धावा करीत लखनऊला १६७ धावांपर्यंत पोहचवले. दिल्लीकडून कुलदीप यादवने शानदार गोलंदाजी केली. त्याने चार षटकांत २० धावा देत तीन विकेट्स घेतल्या. खलील अहमदने दोन विकेट्स घेतल्या. मुकेश कुमार आणि इशांत शर्मा यांना प्रत्येकी एक विकेट घेतली. दरम्यान, अर्शद खाननेही गोलंदाजीत प्रभावित केले.

# सहापैकी पाच सामन्यांमध्ये पराभव पचवणे कठीण -डु प्लेसिस



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचे आपल्या घरच्या मैदानावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला पराभवाची धूळ चारली. मुंबईने पाचपैकी दुसरा सामना जिंकला, तर बंगळुरूने पाचपैकी चार सामने गमावले. या पराभवानंतर आरसीबीचा कर्णधार फाफ डु प्लेसिस याने आपली निराशा व्यक्त केली.

डु प्लेसिस म्हणाला की, सहापैकी पाच सामन्यांत पराभव ही गोष्ट पचवणे कठीण आहे. आजच्या सामन्यात आमच्या गोलंदाजीच्या वेळी सामन्यावर दव पडले आणि गोलंदाजी कठीण झाली. नाणेफेक जिंकलो असतो तर आम्हीही प्रथम गोलंदाजी घेतली असती. मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांना आजच्या विजयाचे श्रेय द्यायला हवे. त्यांनी आमच्या गोलंदाजांना चुका करण्यास भाग पाडले. जो फलंदाज आला त्याने तुफान फटकेबाजी केली.

मला असे वाटते की आमच्या फलंदाजीच्या वेळी आम्ही २००पार धावसंख्या करायला हवी होती. आमच्याकडे गोलंदाजीत तितके तगडे शिलेदार नाहीत याची आम्हाला कल्पना आहे. आमची फलंदाजी हेच आमचे बलस्थान आहे. त्यामुळे आम्हाला त्यातच अधिक चांगली कामगिरी करायला हवी होती. गोलंदाजीबद्दल बोलायचे झाले, तर आमच्याकडे तिखट मारा करणाऱ्या गोलंदाजांची उणीव भासते. आम्हाला मुंबईला पॉवर प्लेमध्येच दोन-तीन विकेट्सचे धक्के द्यायचे होते, पण ते झाले नाही. अशा परिस्थितीत सुरुवातीच्या चार षटकांमध्येच आम्ही सामन्यात बॅकफूटला जातो आणि त्याचा परिणाम आम्हाला भोगावा लागतो, असेही डु प्लेसिसने स्पष्टपणे सांगितले.

# बुमराहने उघड केले स्वतःच्या यशाचे गुपित

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमधील सामन्यात वानखेडेवर मुंबई इंडियन्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सात विकेट्सनी पराभवाची धूळ चारली. या सामन्यात मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंनी गोलंदाजी आणि फलंदाजी या दोन्ही विभागात अप्रतिम कामगिरी केली. सामन्यात वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने मुंबईच्या विजयात मोलाचे योगदान दिले. त्याने चार षटकांत २१ धावा देताना आरसीबीच्या पाच फलंदाजांना तंबूचा रस्ता दाखवला. यानंतर बुमराहने आपल्या गोलंदाजीबद्दल प्रतिक्रिया दिली.

बंगळुरूविरुद्ध दमदार गोलंदाजी करताना जसप्रीत बुमराहने पाच विकेट्स घेतल्या. ज्यामध्ये त्याने विराट कोहली (३), फाफ डू प्लेसिस (६१), महिपाल लोमरोर (०),



सौरव चौहान (९) आणि विजयकुमार वैशाख (०) यांना बाद केले. मुंबईसाठी जसप्रीत बुमराहने एकट्याने किल्ला पकडताना अतिशय अचूक गोलंदाजी केली आणि त्याची विविधता देखील आश्चर्यकारक होती. बुमराहने अचूक यॉर्कर्स आणि बाऊन्सरने फलंदाजांना खूप त्रास दिला. तो आता गोलंदाजांच्या यादीत युझवेंद्र चहलसह दहा विकेट्ससह अव्वल स्थानावर आहे.

सामन्यानंतर जसप्रीत बुमराह म्हणाला, तुम्हाला नेहमी यॉर्कर टाकण्याची गरज नाही. अनेक वेळा यॉर्कर, तर कधी स्लो बॉल टाकावे लागतात. या फॉर्मेटमध्ये अहंकाराला जागा नाही. तुम्ही १४५ किमी प्रतितास वेगाने गोलंदाजी करू शकता, परंतु काहीवेळा हळू गोलंदाजी करणे आवश्यक असते.

बुमराह पुढे म्हणाला, हा टी-२० फॉरमॅट गोलंदाजांसाठी खूप कठीण आहे. मी माझ्या करिअरच्या सुरुवातीपासूनच विविधतेवर काम केले आहे. जेव्हा माझी कामगिरी चांगली होत नव्हती, तेव्हा मी व्हिडीओ पाहिले आणि काय योग्य आहे आणि काय योग्य नाही याचा बारकाईने अभ्यास केले. त्याचबरोबर गोलंदाजीत काय त्रुटी आहेत त्या समजून घेऊन त्यात सुधारणा केली.

# डीआरएसवरून ऋषभ पंतने घातला अंपायरशी वाद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुक्रवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात डीआरएसबाबत पुन्हा एकदा गदारोळ झाला. याबाबत दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार ऋषभ पंत बराच वेळ मैदानावरील पंचांशी वाद घालताना दिसला.


वास्तविक, वेगवान गोलंदाज इशांत शर्मा दिल्लीसाठी डावातील चौथे षटक टाकत होता. देवदत्त पडिक्कल त्याच्यासमोर फलंदाजी करीत असताना इशांतचा एक चेंडू देवदत्तच्या लेग पॅडजवळून गेला, त्याला अंपायरने वाईड



घोषित केले. त्यानंतर दिल्लीच्या बाजूने या चेंडूवर डीआरएस घेण्यात आला की हा चेंडू वाईड नाही आणि मैदानी पंचांनी निर्णय तिसऱ्या पंचाकडे पाठवला, पण यानंतर पंत बराच वेळ मैदानी पंचांशी वाद घालताना दिसला.

पंतचे म्हणणे होते की त्यांनी डीआरएस घेण्याबाबत कोणताही इशारा केला नाही. त्यामुळे तुम्ही डीआरएस थर्ड अंपायरकडे का जात आहात. यावर पंच म्हणताना दिसले की, तू डीआरएस घेण्याचा इशारा केला होता. यानंतर जेव्हा रिप्लेमध्ये पाहण्यात आला, तेव्हा पंतने डीआरएससाठी इशारा केल्याचे स्पष्ट दिसून आले. त्यामुळे दिल्लीला हा डीआरएसही गमवावा लागला, कारण चेंडू वाईडच होता.

# आयुष बडोनीने केली धोनीशी बरोबरी



## सातव्या क्रमांकावर दोनदा पन्नासहून अधिक धावांची खेळी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सने दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना झाला, ज्यामध्ये ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली दिल्लीने सामना जिंकला. या सामन्यात लखनऊचा फलंदाज आयुष बडोनी याने महेंद्रसिंह धोनीच्या एका खास पराक्रमाशी बरोबरी केली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना लखनऊ संघाची सुरुवात खूपच खराब झाली. त्यांनी ४१ धावांपर्यंत पहिल्या दोन आणि त्यानंतर ९४ धावांपर्यंत सात विकेट्स गमावल्या होत्या. येथून लखनऊला सामन्यात सन्मानजनक धावसंख्या उभारणे खूप कठीण दिसत होते, परंतु २४ वर्षीय युवा खेळाडू आयुष बडोनी आणि अर्शद खानसह धावसंख्या १६७ धावांपर्यंत पोहचवली. आयुषने ३५ चेंडूंत पाच चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ५५ धावांची नाबाद खेळी साकारली. या खेळीच्या जोरावर त्याने आयपीएलमधील धोनीच्या पराक्रमाशी बरोबरी केली.


दिल्लीविरुद्धच्या सामन्यात आयुष बडोनीला लखनऊसाठी सातव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी मैदानात आला. त्यानंतर त्याने एका टोकाकडून डाव हाताळला आणि धावांचा वेग वाढवण्याचे काम केले. आयुषने अर्शद खानबरोबर ४२ चेंडूंत ७३ धावांची भागीदारी केली. यादरम्याने त्याने ५५ धावांच्या नाबाद खेळीसह धोनीच्या आयपीएल इतिहासातील विक्रमाशी बरोबरी केली. आयपीएलच्या इतिहासात या सामन्यापूर्वी केवळ धोनीने भारतीय खेळाडू म्हणून सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना दोनदा पन्नासहून अधिक धावांची इनिंग खेळली होती. आता बडोनीने धोनीच्या विक्रमाशी बरोबरी केली. याआधी, २०२३च्या आयपीएल हंगामात लखनऊच्या मैदानावर सीएसकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात बडोनीने सातव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ५९ धावांची नाबाद खेळी केली होती.

आयपीएलच्या इतिहासात आतापर्यंत सातव्या क्रमांकावर सर्वाधिक अर्धशतक झळकावण्याचा विक्रम आंद्रे रसेलच्या नावावर आहे, ज्याने पाच वेळा हा पराक्रम केला आहे. यानंतर आयुष बडोनी, पॅट कमिन्स आणि महेंद्रसिंह धोनी यांची नावे आहेत, ज्यांनी प्रत्येकी दोन वेळा हा पराक्रम केला आहे.

### आठव्या विकेटसाठी विक्रमी भागिदारी

लखनऊ सुपर जायंट्ससाठी आठव्या विकेटसाठी भागीदारी करताना दोन्ही फलंदाजांनी सर्वाधिक धावा जोडल्या. आजपर्यंत आयपीएलच्या इतिहासात कोणत्याही जोडीने आठव्या विकेटसाठी इतक्या धावा केल्या नाहीत. आयपीएलचा हा एक मोठा विक्रम आहे, जो आयुष बडोनी आणि अर्शद खानने आपल्या नावावर केला आहे. यादरम्यान बडोनीने ३५ चेंडूंत पाच चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने नाबाद ५५ धावा केल्या, तर खानने बडोनीला साथ देताना १६ चेंडूंत २० धावा केल्या. जिथे त्याने दोन चौकार मारले. दोघांनी ४२ चेंडूंत ७३ धावांची भागीदारी साकारली.

# भर सामन्यात विराटने पकडले कान; व्हिडीओ व्हायरल



**मुंबई : रामप्रहर वृत्त**

वानखेडे स्टेडियमवर झालेल्या आयपीएलच्या सामन्यात मुंबई इंडियन्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा सात गडी राखून पराभव केला. या सामन्यात बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली बॅटने काही खास करू शकला नाही, पण विराटच्या एका मजेशीर कृतीने वानखेडे स्टेडियमवर उपस्थित प्रेक्षकांना हसायला भाग पाडले. त्याने अचानक भर सामन्यात आपले दोन्ही कान पकडले. विराटच्या या कृतीचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.

प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूने मुंबई इंडियन्स संघासमोर विजयासाठी १९७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात मुंबईने सहज विजय साकारला. सामन्यादरम्यान जेव्हा विराट कोहली लाँग ऑफवर क्षेत्ररक्षण करीत होता, तेव्हा प्रेक्षक काहीतरी बोलले. ज्यामुळे विराटने आपले दोन्ही कान पकडले.

मुंबईविरुद्धच्या सामन्यात बंगळुरूच्या गोलंदाजांची धुलाई होत असताना प्रेक्षकांचा एक गट 'विराट कोहलीला गोलंदाजी करू द्या' असे ओरडू लागला. विराट त्या वेळी लाँग ऑफमध्ये क्षेत्ररक्षण करीत होता. यानंतर चाहत्यांच्या या मागणीवर विराटने हसत हसत आपले दोन्ही कान पकडले आणि गोलंदाजी न करण्याचे संकेत दिले. यानंतर त्याने हात हलवून प्रेक्षकांचे अभिवादन स्वीकारले. विराटच्या या कृतीचा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे.

# संजय सरदेसाई यांची पॉवरलिफ्टिंग इंडियाच्या सहसचिवपदी नियुक्ती

**पनवेल** : महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त आंतरराष्ट्रीय पंच आणि कुशल संघटक संजय प्रतापराव सरदेसाई यांची पॉवरलिफ्टिंग इंडिया या राष्ट्रीय संघटनेवर सहसचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय संघटनेची सभा नुकतीच हैदराबाद येथे झाली. या सभेत संजय सरदेसाई यांची सहसचिव म्हणून निवड झाली. याबद्दल रायगड पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने सरदेसाई यांचे अभिनंदन केले.



# पॅरिस ऑलिम्पिकपासून 'सुवर्ण' विजेत्यांना रोख पारितोषिक

**मोनाको : वृत्तसंस्था**

आगामी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेपासून जागतिक ॲथलेटिक्स संघटनेने 'ट्रॅक ॲण्ड फिल्ड' प्रकारातील प्रत्येक सुवर्णपदक-विजेत्या खेळाडूला रोख ५० हजार डॉलर (साधारण ४१ लाख ६० हजार ७५ रुपये) पारितोषिक देण्याचा निर्णय घेतला आहे. ऑलिम्पिक स्पर्धेतील पदकविजेत्यास रोख पारितोषिक देणारी जागतिक ॲथलेटिक्स ही पहिली संघटना ठरली आहे.

'ट्रॅक ॲण्ड फिल्ड'च्या



शिखर संघटनेने यासाठी २४ लाख डॉलर (अंदाजे २० कोटी रुपये) इतकी रक्कम बाजूला ठेवली आहे. पॅरिस ऑलिम्पिकमधील ४८ प्रकारातील प्रत्येक सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. रौप्य आणि कांस्यपदक विजेत्यांना रोख पारितोषिक देण्यास २०२८ लॉस एंजेलिस ऑलिम्पिकपासून सुरुवात होईल. रिले शर्यतीसाठी ५० हजार डॉलरचे पारितोषिक चार जणांत वाटून देण्यात येईल.

आधुनिक ऑलिम्पिकची उत्पत्ती ही हौशी क्रीडा स्पर्धा म्हणून झाली आणि स्पर्धेत आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती रोख पारितोषिक देत नाही. अनेक पदकविजेत्यांना त्यांच्या देशाकडून किंवा पुरस्कर्त्यांकडून रोख पारितोषिके दिली जातात.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com